म. ग्रं. सं. ठाणें
विषय — चरित्र
सं. क्र. २५०३
REFBK-0000188



श्री साधु बाळकृष्ण महाराज.

औरंगाबाद.

# श्रीसाधु बाळकृष्णमहाराज

## यांचें चरित्र.


लिहिणार

ज्योतिर्विभूषण

**भगवंत गोविंद तोडेवाले,**

रमलशास्त्री, उत्पादक व चालक 'ग्रहविहारभुवन'

पैठण, शुकरंभासंवादाचे उडदू कवितावद्ध



REFBK-0000188



'मनोहर' छापखान्यांत छापलें,

तें ग्रंथकर्त्यानें पैठण येथें प्रसिद्ध केलें.



ग्रंथालय १८८ दा. क्र. १९६४ शाखा स्थळ


किंमत १ रुपया.


[ सर्व हक्क राखून ठेविले आहेत ]

# अर्पणपत्रिका.



श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य
श्रीमद्द्वारकापुरवराधीश्वरपश्चिमाम्नायश्रीम-
च्छारदापीठाधीश्वरश्रीमद्राजरामेश्वरशं-
कराश्रमस्वामिचरणकमलभृंगायमान-
श्रीमद्द्वारकाशारदामठाधीश्वर-
श्रीमन्माधवतीर्थस्वामीचे

**चरणकमलसेवेस**

हें

अल्प चरित्र तच्चरणलोलुप कर्त्यांनें
अत्यंत आदरपूर्वक अर्पण
केलें असें.

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

सर्व सृष्टीवर ज्यांचा दाब व सत्ता; ज्यांच्या वचनाची किंमत अमोल; ज्यांच्या मुखांतील अक्षरें निघालेलीं झेलण्यास व सेवा करण्यास रंकापासून राजशकट हांकणाऱ्या महाराजांपावेतों तयार; ज्यांच्या वैभवाची, थोरपणाची, दैवशालित्वाची तुलना करण्यास जगतितलावर उदाहरणच नाहीं; ज्यांना जाति नाहीं, धर्म नाहीं; ज्यांच्यापेक्षां सत्ताधिकारि श्रेष्ठ कोणीच नाहीं; जे ते बोलतील तेंच करतील, तें टाळण्यास ब्रह्मदेवाचेंही सामर्थ्य नाहीं; जे पूर्ण बेपर्वा, निरभिमानी; ज्यांना कोणत्याच प्रकारचें भय नाहीं; ज्या मायेचा पगडा सर्व जगावर असूनही ती ज्यांना भिऊन दूर पळते; ज्यांनीं प्रापंचिक कार्यकारणसंबंधत्याग केला आहे; मेघ, कल्पतरू व परिस यांचीही उपमा ज्यांना शोभत नाहीं; असें कोण ? या प्रश्नाच्या उत्तरांत कोणी असेंच सांगेल, कीं असा एक त्रिभुवनाधीश ईश्वरच आहे. परंतु कविवर्य पंतांनीं ह्मटलें आहे कीं,

## आर्या.

मी जरि उपमा द्यावी, न्यूनचि ते मेघ कल्पतरु परिस ॥
परिसे महिमा राजा, देव ह्मणे साधु श्रेष्ठ मजपरिस ॥ १ ॥

या आर्येवरून सिद्ध होत आहे कीं, देवानें ज्यांना श्रेष्ठ ह्मटलें आहे, असे जे साधु तेच श्रेष्ठ होत; व साधूंचें महत्व कसें असतें, हें जगास कळण्यासाठींच, प्रभूंनीं श्रीखंड्याच्या रूपानें श्रीएकनाथांच्या घरीं गंध उगाळून आवडीनें कावडीनें गंगेचें पाणी वाहिलें आहे, हें नाथचरित्रावरून सर्वांस प्रसिद्धच आहे. आणि श्रीकृष्ण परमात्म्यांनीं गीतेंतही असे ह्मटलें आहे कीं—

"परित्राणाय साधूनाम्, * * * संभवामि युगे युगे"

..., साधूंच्या संरक्षणार्थच प्रभूजी युगायुगाच्या ठिकाणीं अव... प्रकट होतात, हें त्यांच्याच वचनावरून सिद्ध आहे. असें

साधूंचें माहात्म्य सबल व महत्व प्रबळ आहे, ह्मणूनच एका प्राचीन कवीनें ह्मटलें आहे कीं,—

" गावीं संत चरित्रें हो, पावन परम पवित्रें हो "

या न्यायास अनुसरूनच ( जरी मला असें वाटत होतें कीं, आपल्यासारख्या यःकश्चिताच्या हातून हें कार्य सिद्धीस जाऊन रसिकजनांच्या अंतःकरणास संतोष होणार नाहीं, तरी )

" वेडा वांकुडा गाईन, दास तुझा ह्मणवीन "

या साधुश्रेष्ठ शक्तीस स्मरून श्री साधू बाळकृष्णमहाराजांस प्रार्थना करून हें त्यांचें परम पवित्र चरित्र या अल्पमतीनें लिहिलें आहे.

मराठी भाषेंत पुस्तक लिहिण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न आहे, म्हणून यांत दोष निःसंशय पुष्कळ असतील. तथापि रसिकजनांनीं हंसक्षीरन्यायानें अल्पस्वल्प असलेल्या गुणाचाच स्वीकार करावा, ही प्रार्थना आहे.

श्रीबाळकृष्ण महाराजांच्या माहितीसंबंधानें वे. रा. रा. कैलासवासी रावजीभट बाबरेकर ( महाराजांचे बंधु ), वे. शा. रा. विष्णु भटजी उर्फ गुरुजी महाराज खांबगांकर, रा. रा. रामरावजी आंबेकर देशपांडे, शिरस्तेदार, हल्लीं मुक्काम औरंगाबाद, रा. रा. गंगाधर गोपाळ सिंगेदार, फौजदारी तहसील, औरंगाबाद, रा . रा. पंडितरावजी वकील, दर्जे दुवम, रा. रा. भाऊसाहेब जागिरदार, चणकवाडी, रा.रा. विष्णुपंत जागिरदार, चणकवाडी, रा. रा. बळवंतरावजी अण्णासाहेब, सिंगेदार, सदर अदालत, औरंगाबाद, रा. रा. केशव दिनानाथ फोटोग्राफर व त्यांचे बंधु रा. रा. विश्वनाथ दिनानाथ, ती.रा. रा. हरि भवानी, माहफीज दप्तर, भोकरधन, या सर्वत्रांचा व याशिवाय कांहीं सद्गृहस्थांकडून माहिती मिळाली आहे, त्यांचाही मी फार फार आभारी आहें.

मुक्काम पुणें –सिटी.
तारीख १ आगष्ट १०९४.

ग्रंथकत[redacted]

# श्रीमत्सद्गुरु बाळकृष्ण महाराज यांचें चरित्र.

शार्दूलविक्रीडित.

ये पापं शमयंति संगतिभृतो ये दानशृंगारिणो
येषां वृत्तमतीव निर्मलतरं येषां न भग्न व्रतं ।
ये सर्वानपि तोषयंति सततं ते साधवो दुर्लभा
गंगावद् गजगंडवद् गगनवद् गांगेयवद् गेयवत् ॥

कसबे बावरें परगणें फुलंबरी, तालुके औरंगाबाद, जिल्हे मजकूर सिम्त गर्बी निझाम दक्षिण हैद्राबाद, इलाखे मोगलाई येथें एक दक्षिणी यजुर्वेदी भारद्वाजगोत्री अविघ्नेश श्रीगणेश मंगलमूर्तीचा उपासक नाटुभट नांवाचा ब्राह्मण रहात असे. नाटूभटजीस बावरेची जोसपणाची वृत्ति असल्यामुळें त्यावरच त्यांचा निर्वाह होत असे. हे गृहस्थ कालमानाप्रमाणें सामान्य प्रतीचे वैदिक, स्नानसंध्याशील व प्रापंचिक होते. यांची भार्या आर्या पतिसेवातत्पर, नम्र, सरळ, भोळी आणि साध्या स्वभावाची मननसाध्वी, पातिव्रत्यव्रतांत पूर्ण निष्णात, अशी सुहास्यवदना सौभाग्यसंपन्न ललिताबाई नांवाची होती. हिच्यापासून त्यांना तीन पुत्र व दोन कन्या अशीं अपत्यें जाहलीं. प्रथमतःच ललिताबाईस सदाशिव नांवाचा मुलगा, नंतर बाळकृष्ण, त्यापुढें रावजी त्याच्या मागून पार्वती आणि सोनाबाई अशा मुली झाल्या. या पांचांत व त्यांत बाळकृष्ण हा केवळ नररत्न कीं ज्यांच्या कीर्तीचा ध्वज निजामशाही रामदेवबाबांकडे फडकत आहे, तोच आमच्या चरित्राचा मुख्य नायक असल्यामुळें आह्मी तिकडेस वळतों.

श्री बाळकृष्णाचा जन्म शके १७३४ भाद्रपद शु. ८ रोजीं झाला, व हा दिवसेंदिवस वाढूं लागला. पांचसहा महिन्यापासूनच हा रांगत असे आणि नवव्या महिन्यापासून तर तो भिंतीस धरून उभा राहून हळूहळू पाऊल टाकीत असे. बाळकृष्णाची लहानपणापासूनच वृत्ति चंचल होती. त्यानें सर्वकाल कोणाचेही तोंडाकडेस पाहून हंसावें. त्याचें रडणें तर फार क्वचित् ऐकूं येत असे. नवव्या दाहव्या महिन्यापासूनच त्यानें तोंडावाटे कांहीं अक्षरांचा उच्चार करण्यास आरंभ केला. वर्षाच्या आंतील मुलें प्रथमारंभीं ' मा-मा ' ' का-का, ' 'बा-बा,' ' दा-दा, ' ' तात्या ' वगैरे उच्चार करित असतात त्याप्रमाणें यांनीं पहिल्यानेंच ' राम—राम ' असें ह्मणावें. त्यापुढें त्याला प्रत्येकाचा नामोच्चार आणि थोडी थोडी भाषा बोलतां येऊं लागली. तरी त्यानें हरएक मनुष्याचें नांवापूर्वी 'राम' हा शब्द लावून त्यास हाक मारावी; जसें राम काका, राम बाबा, राम मामा वगैरे. आणि त्यानें आईस देवी असें ह्मणावें. यावरून घरच्या मंडळीचा समज असा झाला होता कीं, अजून त्याला आई म्हणतां येत नाहीं ह्मणून हा देवी ह्मणत असेल पुढें पुढें तर त्यानें प्रत्येक वाक्यारंभीं रामनाम लावून भाषण करावें. जसें, राम पाणी पाज, राम अंघोळ घाल, राम बाहेर ने, राम बाबा, राम विनायक आला, राम हरिभाऊ गेला; यावरून असें वाटतें कीं, बालकृष्णाच्या ललिता मातोश्रीनें त्यास ' राम ' या परम पवित्र, पूज्य, शुद्ध व शुभ नामाचाच एखाद्या स्थिर सन्मुहुर्तानें सतत घोष करण्यास प्रथम प्रारंभ करून दिला असावा. अथवा बाळकृष्णानें जन्मजन्मांतराचे ठिकाणीं एकनिष्ठपणानें महत्कष्ट भोगून रामोपासनात्मक तपश्चर्या केली असेल. ह्मणून या बालमूर्तीस त्या नामाची सहजस्फूर्ति [illegible] सर्व ईशविभूति व सृष्टींतील पदार्थ त्यास रामरूप भासूं व दिसूं लां[illegible]स्यावे.

कांहीं दिवसपावेतों बाळकृष्णानें आपले आईसच देवी [illegible] णावें. परंतु पुढें पुढें तर त्यानें प्रत्येक स्त्रीनामाचे पूर्वी ' [illegible] शब्द लावावा. जसें देवीकाकू, देवीमावशी, देवीआत्या [illegible]

वगैरे. हें ऐकून घरच्या मंडळीस व बाहेरच्या लोकांस आश्चर्य वाटत असे व त्या सर्वांनीं त्यास राम व देवीवांचून उच्चार करण्यास पुष्कळ शिकवावें व सांगावें, परंतु त्यानें कधीं चुकूनसुद्धां साधा, सरळ, असा कोणाचाच नामोच्चार केला नाहीं.नारूभटांनीं यासंबंधानें एकदोन वेळां ठोकही देऊन पाहिला, परंतु कांहीं एक जाहलें नाहीं. असा क्रम बाळकृष्णाचे पांच वर्षांपर्यंत सतत चालला. बाळकृष्णास बाळपणापासूनच आईबापांचा मुळीं ळळा नसे. ललिताबाई जात्या सरळ, नम्र, सुहास्यवदना, गंभीर व स्थिर स्वभावाच्या, प्रत्येकाबरोबर तोंड भरून गोड बोलणाऱ्या असल्यानें, त्या आपल्या गुणानें बहुतेक गांवांतील स्त्रियांस प्रिय झालेल्या होत्या. ललिताबाईच्या स्वभावावर लुब्ध झालेल्या आयाबाया नित्य बऱ्याच बोलण्याचालण्यासाठीं त्यांच्या घरीं येत असत, व बाळकृष्णास नेहमीं आपले घरीं घेऊन जात असत. बाळकृष्णानें कोणाकडेसही जावें, मग ओळख असो वा नसो. आईनें कामकाजाचे गडबडींत एखादे वेळीं, वक्तशीर खाऊं घातलें नाहीं ह्मणून कधीं भुकेच्या बाधेनें तो रडत बसला नाहीं. या त्याच्या शांत प्रकृतीबद्दल ललिताबाईस फार आश्चर्य वाटाे.

नारूभटजींनीं बाळकृष्णास पांचवें वर्ष लागल्यावर विजयादशमीचे मुहूर्तानें 'वक्रतुंड' 'शांताकारं' हीं ध्यानें शिकवून एक अन्नपूर्णाष्टकही शिकविलें होतें. तें पाठ जाहल्यावर त्यानें नेहमीं तेंच ह्मणावें आणि खेळावें. बापाचे स्नानसंध्येचे वेळीं बाळकृष्णानें त्यांचेजवळ बसावें, आणि त्यांचे सारखेंच अनुकरण करावें. त्याचा खेळ ह्मटला ह्मणजे केरसुण्या पोतेरीं व ज्या कांहीं वस्तु हातीं येतील त्या पाटावर मांडून त्यांची पूजा करावी. त्यांस पंचपाळ्यांतील हळदकुंकू वहावें. त्यांवर पाणी ओतावें व आपण जेवलेलें ताट त्यांपुढें आणून ठेवावें, नैवेद्य दाखवावा, अगर कोठें घरांत भाकरपोळी खालीं ठेवलेली दिसली ह्मणजे तेथें जाऊन ती ताटांत घालून आणून नैवेद्य दाखवावा, व त्याला नमस्कार करून आईस ह्मणावें 'देवी, रामदेवाचे-रामदेवबापाचे पायां पड.' आईनें न ऐकल्यास मोठ्यानें रडावें आणि

जेऊं नये, व आईनें नमस्कार केल्यावर तेव्हांच रडें बंद व्हावें. बाळकृष्ण दुसरे मुलांत मुळींच खेळत नसे आणि इतर दांडग्या मुलांसारखी बाळकृष्णाची बालक्रीडा दुसऱ्यांस पीडा देण्यासारखी नसे. त्याची बाललीला कलियुगाला पसंत नसणारी पूजाअर्चा हीच होती. असा क्रम वयाचे सात वर्षेपर्यंत कमीजास्त प्रमाणानें चालला व आठवे वर्षी त्याचा व्रतबंध झाला आणि नाटूभटजींनीं त्यास वेदाध्ययन करण्यासाठीं त्या गांवांतील विद्वान् दशग्रंथी नारायण सखाराम जोशी बावरेकर (हे गृहस्थ नाटूभटजीच्या आप्तसंबंधांतीलच असत ) यांच्या स्वाधीन करून दिलें व त्याच्या आठव्या वर्षापासून त्याचें वेदाध्ययन सुरू जाहलें.

बाळकृष्ण हा मुलगा तेव्हांच चाणक्ष, चंचल, अतिबुद्धिमान् व एकपाठी असल्यासारखा होता. तो गुरूपाशीं राहून एक वर्ष झालें नाहीं तोंच त्याच्यावर गुरूजीचेंही प्रेम उत्तम बसलें. त्याची बुद्धि, कल्पना, पाठशक्ति पाहून त्यांना आनंद वाटूं लागला व त्यांनीं बाळकृष्णास निर्मल अंत:करणानें शिकविण्यास आरंभ केला. त्यावेळीं नारायण सखाराम जोशांच्या पाठशाळेंत गांवांतील बरींच मुलें वेदाध्ययनासाठीं कांहीं बाळकृष्णाचीं समवयस्क व कांहीं मोठींही येत होतीं. परंतु सर्वांत तैलबुद्धि, शीघ्रपाठी अभ्यासी बाळकृष्णच ठरला होता. गुरूचा लोभ व ममता जास्त बाळकृष्णावरच असल्यामुळें त्यास त्यांनीं गायत्रीमंत्राचा होईल तितका नियमानें सदा जप करण्यास सांगितलें आणि सूर्याराधना शिकविली. त्यास त्यांनीं हीं पारमार्थिक कृत्यें नित्य करण्यास लाविलें.

व्रतबंधाच्या कांहीं दिवसांपूर्वी बाळकृष्णानें वाक्यारंभीं राम नाम म्हणण्याचें सोडून दिलें होतें. परंतु आईस मात्र तो देवी म्हणत होता. जशीं इतर मुलें आईबापांशीं लडिवाळपणानें खेळतात, हंसतात अगर दांडगाई करितात, तसें त्यानें कधींच केलें नाहीं व इतर मुलांबाळांतही त्यानें आपला काल निरर्थक गोट्या, आट्यापाट्या, चेंडूदांडू, पतंग, बावडी किंवा हुतूतू वगैरे खेळण्यांत व कांहीं हट्ट घे-

ऊन त्यांस छळण्यांत व इकडे तिकडे उड्या मारून धांवण्यांत व पळण्यांत घालविला नाहीं.

बाळकृष्णाचा लहानपणापासूनच असा एक नियम असे कीं जेथें झोंप येईल तेथेंच स्वस्थ निजून रहावें; मग ती जमीन ओली असो, कोरडी असो, तेथें कचरा असो, अगर ती कितीही अस्वच्छ असो, हा स्वच्छंदी मुलगा तेथेंच पडून राही. कधीं आंथरूण हातानें घालून अथवा दुसऱ्यानें घातलेल्या आंथरुणावर जाऊन हा निजत नसे. झोंपेंत कोणी नेऊन निजविल्यास निजावें. जोंपर्यंत त्याची अज्ञान स्थिति होती तोंपर्यंत आईबापांनीं व इतर घरांतील दुसऱ्या माणसांनीं उचलून बिछान्यावर त्याला निजवावें; परंतु तो जसजसा मोठा होऊं लागला तसतसा त्याच्या स्वच्छंदीपणानें निजण्याचा त्रास सर्वत्रांस येऊं लागला. व त्याची ही दुष्ट संवय नष्ट व्हावी या उद्देशानें त्यास केव्हां केव्हां शीतकालांतही आंथरुणापांघरुणावांचून तो जेथें पडला असेल तेथें जशाचा तसाच पडूं द्यावा. परंतु तो कधीं हिंवाच्या त्रासानें उठून रात्रीं स्वतः बिछान्यावर जाऊन निजला नाहीं आणि त्याची ती संवय गेली नाहीं. ह्मणून त्यास घरची मंडळी हट्टी, छंदी ह्मणत असत.

बाळकृष्ण आपल्या वयाच्या नवव्या वर्षापासून घरची देवपूजा, नैवेद्यवैश्वदेव मोठ्या आनंदानें व भक्तीनें करीत होता. त्यावांचून प्रापंचिक कोणतेंच काम त्यानें करूं नये व कोणाचें ऐकूं नये. वेदाध्ययनांत मात्र तो पूर्ण निमग्न असे. असा क्रम त्याचे वयाचे बारावें वर्ष पावेतों चालला, व तो इतक्या कालांत उत्तम वैदिक बनला. बावऱ्याचे जोशीपणाचें उत्पन्न चांगलें प्रपंचास पुरेसें होतें. व मुलगा हुषार झाला असें पाहून त्यास हुंड्यासह वधूही सांगून येऊं लागल्या. परंतु त्याचवेळीं बावऱ्यास कोणी काशीकर हिंदुस्थानी फिरस्ता वृद्ध सिद्धांति ज्योतिषि आला होता. नाटूभटजींचा ज्योतिषशास्त्रावर फार विश्वास असे. ह्मणून त्यांनीं आपल्या सर्व मुलांच्या कुंडल्या त्यास नेऊन दाखविल्या. त्यांत बाळकृष्णाची होतीच. ती कुंडली जोशीबुवांनीं

पाहून सांगितलें कीं, हा मुलगा कुलदीपक होणार आहे. परंतु अठरा पासून वीस वर्षें लोटतील तर. कारण, त्या वर्षाला यास अतिशय भयंकर गडांतर आहे. हें ऐकून नाटूभटजांस फार वाईट वाटलें, आणि त्यांनीं बाळकृष्णाच्या वयाचीं वीस वर्षें पूर्ण झाल्यावांचून विवाह करावयाचा नाहीं असा निश्चयही केला. ज्योतिषानें सांगितलेलें वर्तमान बाळकृष्णाच्या गुरुजींस कळलें.त्यांनाही तें ऐकून वाईट वाटलें व ते हळहळले; व त्यांनीं मनांत विचार केला कीं, बाळास (बाळकृष्णास हे ‘ बाळा ’ ह्मणत असत)स्नानसंध्येचा नाद तर त्याच्या मनापासून आहेच तेव्हां त्याच्याकडून एक गायत्रीचें पुरश्चरण करवावें ह्मणजे कांहीं अनिष्ट असल्यास नाश होईल, आणि हा झालेला विचार तात्काळ गुरुजींनीं त्याचे वडिलांस कळविला. नाटूभटजींनींही त्यास कांहीं एक उशीर न करितां संमति दिली. नंतर गुरूनें बाळकृष्णास कळवितांच त्यानें गुरुजींच्या आज्ञेचा प्रेमानें स्वीकार केला. तेरावे वर्षीं एक सुमुहूर्त पाहून त्यावर बाळकृष्णानें निस्सीम भक्तीनें गायत्रीमातुश्रीची आराधना सशास्त्र करण्यास आरंभ केला. वयाचीं एकवीस वर्षें पुरीं होइपर्यंत एकनिष्ठपणानें रात्रंदिवस सोंवळ्यांत राहून त्यानें दोन पुरश्चरणें पूर्ण केलीं.मध्यंतरीं एक पुरश्चरण पूर्ण झाल्यावर अठरावे वर्षीं त्याची प्रकृति ज्वरानें बरीच विघडून एक महिनापर्यंत तो आजारी पडला होता.परंतु महिन्यानंतर ती बेमारी जाऊन पुनः सर्व क्षेम होऊन त्यानें दुसऱ्या पुरश्चरणास आरंभ केला आणि त्याची परिसमाप्ति एकवीस वर्षांनंतर झाली. बाळकृष्णाच्या भर तारुण्याचा प्रारंभ, त्यांतच शुद्ध कडकडीत ब्रह्मचर्यव्रताचें तेज आणि गायत्रीपुरश्चरणाची शरिरावर पूर्ण पसरलेली प्रभा हीं एकवटल्यामुळें त्याचा चेहरा अति देदिप्यमान दिसत असे. सूर्याराधनेनें व नमस्कारानें फिरलेले दंड पीळदार, अंगाची ठेवण सुरेख,उंच बांधा, भव्य कपाळ,लांब नाक, आजानु बाहू, कान मोठे, असा तो तेजस्वी आणि भव्य दिसत असे. त्या तेजःपुंज विरक्त पुरुषावर अनुरक्त होत्साती शक्ति ही मुक्ति मिळण्यासाठींच भक्ति करीत तेथेंच ठाणें बसवून बसली आहे कीं काय,असें वाटत असे.

वरील कालांत बाळकृष्णाचे उभय बंधूभगिनींचीं लग्नें झालीं होतीं. राहतांपैकीं बाळकृष्णाचें राहिलें होतें. एके दिवशीं सकाळीं ललिता-बाई नाट्भटजींस ह्मणाल्या कीं, आतां बाळाचे कष्टकारक अनिष्टाचीं वर्षें ज्योतिषानें सांगितल्याप्रमाणें प्रभुकृपेनें सर्व संपलीं. त्याचा विवाह लौकरच केला पाहिजे, या वर्षांत ठेवतां कामाचा नाहीं. नाट्भट-जींनीं 'त्याची काळजी करण्याचें कारण नाही.कांहीं मुली दोन तीन महिन्यांपूर्वींच सांगून आल्या आहेत. त्यांपैकीं एखादी लवकरच नक्की करून लग्ननिश्चय मी करणार आहें.' ह्मणून सांगितलें.

ज्या दिवशीं मातापित्यांचें हें भाषण झालें, त्याच दिवशीं अस्तमानचे पांच वाजतां बाळकृष्ण आईस ह्मणाला, ' देवी, मला तीर्थयात्रा करण्याची इच्छा झाली आहे. यासाठीं मी उदईक येथून निघणार.' हें ऐकून ललिताबाईस वाईट वाटलें.मुलगा स्वच्छंदी आणि हट्टी आहे, एकदा उठून गेल्यास करावें काय ? असा विचार मनांत आणून ललिताबाई त्यास ह्मणाली:—बाळा, आतां तुझा लग्नसोहळा लवकरच होणार आहे. हे दिवस तुझे तीर्थयात्रेचे नसून संसारांत राहून आनंद करण्याचे आहेत. यासाठीं कोठें न जातां घरींच रहा. हें ऐकून बाळकृष्णानें उत्तर दिलें कीं, या जगांतील सर्व स्त्रिया मला देवी मातोश्री-प्रमाणें आहेत, मग मी विवाह कोणाशीं करावा ? तुह्मी व्यर्थ या खट-पटींत पडूं नका. असें बोलून सायंसंध्येचा काल जवळ आलेला पाहून तो उठला आणि हातपाय धुवून संध्येस बसला. व संध्यास्तोत्रपाठ झाल्यावर नित्य नियमाप्रमाणें देवदर्शनास जाण्यास स्वारी निघून घराबाहेर पडली ती पडलीच ! बाळकृष्ण गांवाबाहेर येऊन मनास येईल तिकडे चालता झाला व त्यानें उत्तर हिंदुस्थानांतील तीर्थयात्रा करण्यांत पांचसहा वर्षें घालविलीं व क्षेत्र काशी येथें पुनः एक गायत्रीचें पुरश्चरण केलें. नंतर दक्षिण हैद्राबादेस आला. तेथें कोणी त्याचे आप्तांपैकीं होते, त्यांच्या घरीं राहून रात्रंदिवस ईशाराधना करावी, मधून मधून कोठें यात्रेसही जावें, अशीं तेथेंही बारा वर्षें घालविलीं. इकडे ललिताबाई पुत्रविरहानें दीन गाय होऊन हाय मो-

कुलीत बसली. बाळकृष्ण हैद्राबादेस आहे असें समजल्यापासून तर तिनें अति आकांत मांडला. व ती नवऱ्यास म्हणाली, 'बाळकृष्णास एकदां कसेंही करून घेरून घरीं आणावें.' तेव्हां नाटूभटजी मुद्दाम हैद्राबादेस गेले आणि त्यांनीं बाळकृष्णास मोठ्या युक्तीप्रयुक्तीनें व आग्रहानें घरीं आणलें. तो घरीं आठ दिवस राहिला. एके दिवशीं अस्तमानीं बाळकृष्ण नित्यनियमाप्रमाणें देवदर्शनास जाण्यास निघाला असतां द्वाराबाहेर एक वृद्ध मनुष्य, ज्याचें वय नव्वद वर्षांवर असेल असा, डोक्यावर जटांचा भार, दाढीचे केस पिंगट व कांहीं पिंवळट जाहलेले, एक लंगोट व अंगावर फाटकें वस्त्र, काखेस झोळी, सर्वांगास भस्म फांसलेलें, कंबर वांकलेली, गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा, कानांत रुद्राक्षांचीच कुंडलें घातलेलीं, हातांत एक यष्टी, असा पुरुष भेटला. बाळकृष्णाची आणि त्याची दृष्टादृष्ट होतांच उभयतांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु आले. बाळकृष्णाचा कंठ सद्गदित झाला. ते एकमेकांस कडकडून भेटले. नंतर तो वृद्ध म्हणाला, 'बेटा, बहुत घूमे, तुह्मे क्या फायदा हुआ? मेरी मुलाकातको भूले? तुह्मारी इन्तेजारी मुद्दत मदीद व आरसे वबीद तक् करते रहा. लेकिन्, तुम् नहीं आये. आखर मजबूर होकर हजार तकलिफे खोचते हुवा मुश्किलसे यहा पोंचा. अब सुधारो राह, छोडो घर व आराम गाह, और करो काम आपना. व न डुबाओ नाम आपना. हमे क्या किसीसे मतलब है? तुह्मारी हमारी रिफाकत मुद्दतसे चले आरही है, ल्याहाजा तुह्मारे वास्ते फिरता हू, और याददेही करता हूं. फिर येह वक्त हात न आवेगा. भलेका बुरा हो जावेगा. अच्छा, निकलो. यह मैने तुह्मारे वास्ते जो लाया हू को, खाव, और जाव.' असें म्हणून बाळकृष्णाचे हातांत त्यांनें कांहीं दिलें, तें त्यानें तत्काळ खाल्लें व त्याचे कानाशीं लागून कांहीं सांगितलें. उभयतां मोठ्यानें हंसले व नेत्रांनीं एकमेकांस कांहीं खुणा केल्या व एक पूर्वेस व एक पश्चिमेस धूम पळत सुटले, व ते लवकरच दृष्टीआड झाले. नाटूभटजींचाही नित्य अस्तमानीं देवदर्शनास जाण्याचा नियम होता. ते बाळकृष्णाचे मागेंच निघाले होते. त्यांनीं हा संवाद मुद्दाम आपले घराच्या द्वारांत बाजूस

उभें राहून पूर्ण ऐकला आणि ते पळूं लागले तेव्हां बाहेर येऊन 'बाळ-कृष्णा, कोठें जातोस ? बाळकृष्णा, थांब इकडे ये,' ह्मणून त्यांनीं हांका मारल्या. परंतु तो मघारीं फिरला नाहीं. पांच सात दिवसांनीं बाळकृष्ण औरंगाबादेस असल्याची वार्ता विष्णुभटजी गुरू-जींनीं ( हे बाळकृष्णाच्या पार्वतीनामक बहिणीचे दीर असत. पार्वती औरंगाबादेसच यांच्या त्रिंबकराज नांवाच्या चुलत बंधूस दिली होती व ती तेथेंच आपल्या नवऱ्यासह रहात होती ) नाटुभटजींस कळविली. तेव्हांपासून बाळकृष्णाचें औरंगाबादेस वास्तव्य सतत असे.

बाळकृष्ण औरंगाबादेस आल्यावर लवकरच ललिताबाईनीं भूलोकीची यात्रा समाप्त करून त्या आपल्या तीव्र पातिव्रत्यतपोबलानें लखलखीत सौभाग्यासह स्वर्गास गेल्या. बाळकृष्ण औरंगाबादेस आल्यावर तो पिशाचवृत्तीनें राहत असे. केव्हां केव्हां कोणास मारीत असे. व स्त्रीपुरुषांस अमंगल व अभद्र गालिप्रदानही करीत असे. ह्मणून कांहीं लोकांनीं सरकारांत ' बाळकृष्णवेड्याचा अति त्रास आहे व त्यापासून इजतीचीही एकादे वेळीं हानि होणार आहे' ह्मणून फिर्याद दिली. सरकारानें त्यास कारागृहांत ठेवण्याचा हुकूम दिला व कैदीलोकांबरोबर त्याला जालनापुरास पाठविलें. तेथून ही मूर्ति औरंगाबादेस रक्षकजनांस नकळत कशी निघून आली, हें कोणासही कळलें नाहीं. औरंगाबादेस आल्यावर त्याला पुन्हां कैदखान्यांत ठेविलें आणि बेडी घातली. ती एकदोनदां तर त्यानें सहजच तोडून टाकली व कांहीं लोक सांगतात कीं, ती घालतांच तुटत असे.

ज्या भवरूपी बेडीस वैभव मानून अज्ञजन बळेच पाय पुढें करून त्यांत बद्ध होतात आणि आनंद मानतात व जी इतकी मजबूत असते कीं जन्मजन्मांतरींही सुटत व तुटत नाही, ती ज्यांनीं तोडली त्यांस लोखंडी बेडीपासून काय होणार, व ती तरी कांहीं अन्याय केल्यावांचून पायांत कशी टिकणार ? असो.

ही स्वच्छंदी मूर्ति, यांनीं जेलचा कायदाकानू छपरावर बसविला. कैद्यांबरोबर हे कधीं बहिर्दिशेस गेले नाहींत. तेथील

रक्षक शिपायांनीं वगैरे कांहीं सांगितल्यास त्यांचें ऐकिलें नाहीं. भलत्याच ठिकाणीं भलत्याच वेळीं शौच करावा. तसेंच कोठेंही लघवी करावी. रात्रीं मोठमोठ्यानें ओरडावें, भजन करावें, मंत्र ह्मणावे, नाचावें, उडावें, धडाधड कवाडास मारावें, मोठ्यानें हंसावें, अशी सारी रात्र धामधूमींत नित्य काढावी. त्या योगानें तेथील कैद्यांस व रक्षकांस किंचित्‌ही झोंप येऊं नये. कधीं कैद्यांचे कपडे फाडावे, कोणास मारावें, शिव्या द्याव्या, असा त्यांनीं सर्वत्रांस त्रास द्यावा. तेथील शिपायांनीं बाळकृष्णाची यथेच्छ लाथाबुक्यांनीं पूजाही करावी, परंतु हे कधींच रडले व ओरडले नाहींत. आणि यांनीं आपलें नित्यकर्तव्य काडीमात्रही सोडलें नाहीं. पुढें पुढें तर त्यांनीं फारच त्रास दिला ह्मणून त्यांस दोनदोन दिवस तेथील रक्षकांनीं अन्नपाणी दिलें नाहीं, तथापि त्यांनीं आपला स्वभाव कधींच सोडला नाहीं, आणि ते किंचित्‌ही थकले किंवा सुकले नाहींत, किंवा त्यांस ग्लानि आली नाहीं. त्यांनीं कधीं पाणीसुद्धां मागितलें नाहीं. तेथील शिपायांनीं हें सर्व त्रासदायक वृत्त आपल्या अधिकाऱ्यापाशीं कळविलें व अधिकाऱ्यानें समक्षही जाऊन त्यांस पुष्कळ वेळां पाहिलें. त्याच्यासमोरही त्यांनीं आपले विचित्र चाळे सोडले नाहींत, व त्याला शिव्या दिल्यावांचून ते राहिले नाहींत. असा हा निर्भय बाळकृष्ण बरेच दिवस कारागृहांत होता. एके वेळीं त्या जेलच्या अधिकाऱ्यावर कांहीं संकट आलें. त्यावेळीं बाळकृष्ण त्याचे स्वप्नांत गेला व त्यांतून मुक्ति होण्यास कांहीं युक्ति सांगितली आणि तूं तीन दिवसांत मोकळाही होशील ह्मणून त्यास कळविलें व त्याप्रमाणें त्यास अनुभव आला, असेंही ऐकण्यांत आलें आहे. व हेंच कारण त्याची पूज्यबुद्धि यांचे ठिकाणीं उत्पन्न होण्यास कारणीभूत झालें. नंतर थोड्याच दिवसांनीं त्या अधिकाऱ्यानें आपल्या श्रेष्ठ अधिकाऱ्यास जाऊन सांगितलें कीं हा वेडा मनुष्य आहे, त्याचा कारागृहवास सर्वत्रांस अति त्रासास कारणीभूत झाला आहे. यासाठीं त्याला तेथें ठेवण्यापासून कांहीं एक उपयोग नाहीं. तेथील अन्योद्योग बंद पडण्याची वेळ आली आ-

हे व तो सामदामदंडांपैकीं कोणच्याही उपायानें ताळ्यावर येण्या-सारखा नाहीं, हें आजपर्यंतच्या अनुभवानें सिद्ध झालें आहे. हें ऐकून वरिष्ठानेंही त्यास तात्काल सोडून देण्याचा हुकूम दिला. तेव्हां हे महाराज मोकळे जाहले. तरी त्यांचा फेरा नित्य त्या कैदखा-न्यांत दिवसांतून एक दोन वेळ असेच. तेव्हांपासूनच त्याला कोणी लोक बाळकृष्ण महाराज ह्मणूं लागले ह्मणून मीही येथून त्यांचा उल्लेख महाराज अशाच नांवानें करणार आहें.

हे कैदेंतून मोकळे झाल्यावर पांच चार वर्षांनीं कांहीं भाविक पण फार थोड्या लोकांची त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होऊं लागली. पुढील भागांत आह्मी त्यांच्या औरंगाबादेंतील लीला लिहिणार आहोंत.

ता..............
ठाणे.

## भाग दुसरा

बाळकृष्ण महाराज औरंगाबादेस असतांना नानाप्रकारचे चमत्कार लोकांचे अनुभवास आले आहेत. यांचें वर्तन अशा पुरुषांचें बहुतेक असतें तसें अत्यंत स्वेच्छाचारी असे. [illegible] त्या ठिकाणीं बसून त्यांच्या इच्छेप्रमाणें ते वेदमंत्र अति उत्तम स्वरावर ह्मणत असत. ते मंत्र कोणी पट्टीच्या वैदिक विद्वानांनीं ऐकिले तरीही मानच डोलवावी. यांनीं वेदांतील पदें, क्रम, जटा, घन, माला, वगैरेही ह्मणतांना लोकांनीं ऐकिलें आहे. आश्चर्य हें कीं, एकाच वेदांतील मंत्र हे ह्मणत असत असें नाहीं, तर कधीं ऋग्वेदांतील, कधीं युजर्वेदांतील व केव्हां सामवेदांतीलही ह्मणत. रा. रा. हरी भवानी महाफीत दफ्तर भाकरधन यांनीं असें सांगितलें कीं, मी औरंगाबादेस नौकर असतांना एके समयीं परळीकर वैदिक मंडळी माझे येथें आली होती. त्यांत एक ब्राह्मण सामवेदाचें उत्तम अध्ययन केलेला असे. ती मंडळी माझे घरीं असतांना एके दिवशीं रात्रीं बाळकृष्णबोवाही तेथें

आले, व त्यांनीं दोनचार मंत्र सामवेदांतील सुस्वरावर ह्मटले. ते ऐकून परळीकर फार खुष जाहले. केव्हां केव्हां यांनीं श्रीमद्भागवतांतील दशम स्कंधांतील कित्येक श्लोक मुखानें स्पष्ट ह्मणून त्यांचा यथार्थ अर्थ पुराणिकासारखा सुरावर सांगावा. योगवाशिष्टांतील व गीताभाष्यांतीलही महत्वाचीं प्रकरणें यांनीं तोंडानेंच ह्मणावीं. श्रीमज्जगत् गुरूंच्या चर्पटपंजरीचा तर फार पाठ करावा. कधीं कधीं भगवद्गीतेचा पाठ म्हणावा. कधीं सकाळीं प्रातःस्मरामि, भूपाळया वगैरेही ह्मणत असाव्या. हे दोहरे, कवित, पदें, ओव्या, श्लोक, सुभाषित, आर्या, लावण्या, व मुसलमानी आणि फारशी भाषेंतील कविता गजल वगैरेही इच्छेप्रमाणें म्हणत असत. फारशी भाषेंतील गुलिस्ता, बोस्ता, वगैरे बोधपर किताबांतील कविताही हे नेहमीं ह्मणत असत. कधीं कधी महाराज मशीदींतून अगर इतर ठिकाणांतून नमाजही पढत असत. दहा वर्षांपूर्वी नमाज पढतांना मी त्यांना तीन वेळां स्वतः पाहिलें आहें. कानांत बोटें घालून उभ्यानें महाराज आजा देत असत, त्या वेळीं हुबेहूब यवनाचे स्वरासाराखा शुद्ध स्वर काढीत असत, आणि आरबी भाषेंतील नमाजी मंत्र ह्मणत. यांनीं एके समयीं कुराण शरीफ या किताबांतीलच "लम् ईलद् व लम् यूलद्" ही आयत ईश्वराचे वर्णनात्मक ह्मणतांना मी प्रत्यक्ष ऐकिली आहे. त्या समयीं मजबरोबर माझा एक मित्र करिमुद्दीन नांवाचा शिकलेला हुषार होता. त्यानें यांनीं केलेल्या शुद्ध उच्चारासंबधानें फार आश्चर्य केलें. हे कधीं कधीं स्तोत्रपाठ, संध्या व सूक्तेंही ह्मणत असत. या वरील सर्व गोष्टींवरून यांना किती भाषा व काय काय येत होतें याचा कोणासच तर्क होत नसे.

यांनीं इतर वेदांचें वगैरे अध्ययन व अभ्यास कोणत्या वेळीं, कोणत्या ठिकाणीं, कोणत्या गुरूपाशीं, केला असेल त्याचाही कांहीं एक शोध लागला नाहीं.

यांचा वर्तनक्रम कोणत्याही प्रकारचा नित्यनियमित नसे, व त्यांचें बसण्याचे, निजण्याचें, भोजनाचें वगैरे ठिकाणही एकच कायमचें

नव्हतें. मात्र औरंगाबादेस श्रीनिवासरावजी नानासाहेब, डुअम्म तालुकेदार साहेब विजापुर यांच्या कचेरींतील पेषकार होते, त्यांच्या घरीं ते विशेष जात असत, व श्रीनिवासरावजींची यांच्याविषयीं पूज्य-बुद्धि होती. ह्मणून त्यांनीं यांच्यासाठीं आपल्या घरीं एक पृथक् जागा करून ठेविली होती व तेथें उत्तम बिछाना, गाद्या, लोड. तक्ये घालून ठेविले होते. ही बिछाईत नेहेमीकरितां कायमची केली असे. त्या ठि-काणीं यांच्यावांचून दुसऱ्यास जाण्याची परवानगी नसे. लोकवार्तेवरून असेंही समजत आहे कीं, महाराजांची त्यांच्यावर चांगली कृपा होती. दुसरें त्यांचें विशेष बैठकीचें ठिकाण ह्मटलें ह्मणजे पाण्याच्या दरीब्यां-तील अप्पा हालवायाचें दुकान होय. त्यांचें तिसरें ठिकाण सराफ्यांतील साध्वी गेंदाबाईचें मकाण, आणि त्यांच्या बसण्याचें चौथें स्थान पाराजी हालवाई याचें राज्याच्या बाजारांतील दुकान होतें. हे स्वच्छंदी महाराज एखादे वेळीं कांहीं ऐकत असत तर या पाराजीचेंच, याचेशिवाय शहरांत दुसऱ्या कोणाचें हे कधींच ऐकत नसत. पाराजी हा औरंगाबादेस आल्यापासून यांना मनोभावानें भजत असे. त्याचा लय त्यांचे ठिकाणीं इतका काय ह्मणून लागला होता, हें परमेश्वर जाणें. इतरांना हे जसे वेडे होते, तसे ते पाराजीला नसत. पाराजीनें कधींच त्यांना वेडा पिसा ह्मटलें नाहीं. उलट त्यानें ह्मणावें, हे देवबाप्पा आहेत. कोणी सांगतात कीं, पाराजी जातीचा माळी असून, महाराजांच्याच कांहीं प्रसादकृतीनें त्यानें हालवायाचें दुकान घातलें, आणि त्यांतच त्याची बरीच भरभराट आमरण राहिली. हें दुकान अजूनपावेतों औरंगाबादेस आहे. कित्येक लोकांच्या सांगण्यावरून असेंही समजतें कीं, रात्रीं अथवा दिवसास कोणत्याही वेळीं पाराजीपाशीं जाऊन बाळकृष्ण महाराज कोठें आहेत, ह्मणून विचारलें, तर तो त्यांचा नक्की पत्ता सांगत असे. तो त्यास कसा समजत असे, याबद्दल लोकांस आश्चर्य व चमत्कार वाटत होता. कारण, ती मूर्ति एकाच नियमित जागीं बसणारी नसून, कधीं कोठें जाणार, तें कोणास खरळ सांगतही नसे. हे नेहमीं शहरांत फिरत असत आणि इच्छेस येईल त्यांच्या घ-

रींही जात असत. बकदालभ्यऋषि हे सर्व जगन्मात्र क्षणिक आहे, असें मानून निवाऱ्यासाठीं एक पेंढी मस्तकावर घेऊन, आपलें आयुष्य कंठीत बसल्याबद्दल पुराणांत कथाभाग आहे. पण महाराजांनीं तर एका काडीचाही कधीं आश्रय केला नाहीं. यावरून हे या सृष्टीस किती क्षणिक मानीत होते, याचा तर्क वाचकच करतील.

औरंगाबादेस आल्यापासून त्यांची नित्य स्नानसंध्या, जपज्याप्य, अनुष्ठान, वगैरे बाहेरून दिसण्यासारखीं कांहींएक नव्हतीं.'मनमे गंगा, मनमे कासी, मनमे स्नान करे' या अनुभवी कबीरकवितेप्रमाणें हे मानसिक स्नानानें शुद्ध असत. तसेंच पूजाअर्चेचें बंडही यांच्या ठिकाणीं त्या वेळीं थंड पडलें होतें. त्यांची पूजा श्रीमज्जगद्गुरू श्रीशंकराचार्यांच्या उक्तीप्रमाणें असे :

"आत्मा त्वं गिरिजापतिः सहचरान् प्राणान् शरीरं गृहं
पूजार्थी विषयोपभोगरचना निद्रा समाधिस्थितिः ।
संचारः पदवीप्रदक्षिणविधौ स्तोत्राणि सर्वा गिरा
यद्यत् कर्म करोति तत्त्वमखिलं शंभो तवाराधनम् ॥"

यांना थाटमाटाची, आसनवसनांची कांहींच गरज नसे. पृथ्वितलावर जेथें हे वसतील तेंच त्यांचें निर्मल, पवित्र,शुद्ध व सिद्धासन होतें.

"देहे देवालयं प्रोक्तं जीवो देवः सदाशिवः ।
त्यजदज्ञाननिर्माल्यं सोऽहंभावेन पूजितः ॥"

याप्रमाणें त्यांना देहावांचून अन्य देवालय नसे. त्यांतील आत्माच परमात्मा हें त्यांनीं पूर्णपणानें जाणिलें होतें, व त्याचीच ते एकनिष्ठपणानें व सतुष्ट अंतःकरणानें निशिदिनीं पूजा करीत असत. त्यांच्या ( भद्राभद्र कांहीं का असेना ) बोलण्याचा जो थाट, तोच स्तोत्रपाठ असे. त्यांना वाटेल तिकडे फिरणें, तीच त्यांची प्रदक्षिणा करणें होतें. पूजासाहित्य जमविण्यासाठीं त्यांस अन्योद्योग करावे लागत नसत.सहज उपभोग हीच त्यांची साग्र सामुग्री असे. त्यांची झोंप समाधि स्थितीचें स्पष्ट स्वरूप होतें. सारांश,त्यांचीं सर्व कर्में तदर्पण होतीं. व त्यांचें दिवसांतील एक निमिषही ईशचिंतन व सेवेवांचून निरर्थक जात नसे,

असें त्याच्या निर्मल अंतःकरणाच्या सत्यवर्तनावरून दिसत होतें. हे कधीं कधीं "अहं ब्रह्मोऽस्मि" अथवा "मन्‌खुदायं" असेंही म्हणत असत. औरंगाबादेस आल्यापासून त्यांचे ठिकाणीं जातिभेद मुळींच नसे. कोणी कांहीं खाण्यास दिलें, तर इच्छेस वाटल्यास ते खात असत. यांनीं कोठें पात्रावर बसून शांतपणानें सावकाश दहापांच मिनिटें भोजन केलें, असें कोणाच्याच कधीं पाहण्यांत नाहीं. कोठें एखादादुसरा घांस खाल्ला कीं चालले. यांना कोणत्याही वेळीं कोणी कांहीं खावयास दिलें कीं, त्यांतील निमा भाग जवळ असणाऱ्या मनुष्यांस, पशूंस पूर्वी देऊन नंतर आपण त्यांतील कांहीं खात असत. यांच्या पंक्तीस कुत्रे नेहमीं रहात असत. त्यांचें असाक्षिभोजन कधींही होत नसे. यावरून यांच्या ठिकाणीं भूतदया किती जागृत होती हें निराळें सांगणें नको.

वेदशास्त्रसंपन्न वाळकृष्णबोवा कडेकर हरिदास यांनीं असें सांगितलें कीं, मी औरंगाबादेस माधवरावजी राळे वकील यांच्या घरीं होतों. एके दिवशीं बाळकृष्णबुवा तेथें आले. हे प्रश्नाचें उत्तर कधीं सरळ देत नाहींत, असें मला माहित होतें; तरी मी त्यांना लीलेनें विचारलें कीं, महाराज आपलें रहाणें कोठचें ? आणि आपला परिवार काय ? त्याच्या उत्तरांत त्यांनीं पुढील श्लोक म्हटलाः—

" विश्वेशो जनको उमाच्च जननी गंगाच मात्रश्वसा
ढुंढिभैरव दंडपाणिसदृशा ज्येष्ठा मम भ्रातरः ।
श्रीकाशीमणिकर्णिकाच भगिनी भार्या ममेय मतिः
सत्कर्माणि सुतास्त एव सुहृदा काश्यां कुटुम्बं मम ॥ "

हें ऐकून मला फार आश्चर्य वाटलें. निजण्याचाही त्यांचा नियम नसे. हे रात्रींतून कोठें घंटा अर्धीघंटा निरामय गाढ झोपेंत निजलेले कोणाच्याच दृष्टीस पडले नाहींत. दिवसा तर हें मुळींच निजत नसत. रात्रीं हे निरनिराळ्या ठिकाणीं मार्गांतून कोणत्याही फिरणाऱ्या मनुष्याला आढळत असत. शहरसंरक्षण करीत असणाऱ्या कोतवाली लोकांस हे सदैव भेटत असत, हें त्यांचें सुदैवच होय. केव्हां

केव्हां थोडा वेळ त्यांच्या बरोबर फिरून, ते पुढें लिहिल्याप्रमाणें मोठमोठ्यानें ओरडत असत. " सावध असाहो शहरवाले ! चोर तुमच्या घरावर आले. तुमचें सर्व वैभव लुटून गेलें हो. सावध व्हा, सावध व्हा, सावध व्हा !" हो महाराजांचीं वाक्यें किती बोधप्रद आहेत! परंतु त्यांवर लक्ष देतो कोण ? त्याचा अर्थ असा असला पाहिजे कीं, या मायावी रात्रींत मोहपाशांत बद्ध असलेले तुम्ही सर्वजण अज्ञानांत निर्धास्त निद्रिस्त व असावध आहांत, व काम क्रोधादि चोरांनीं तुमचें ज्ञानरूप वैभव लुटून नेलें आहे. आतां तरी सावध होऊन पहा. एखादे वेळीं अपरात्रीचे कोणाच्याही घरास धक्के देऊन हे हाका मारीत असत, अथवा पदं वगैरे मोठ्या सुरानें ह्मणत व राजमार्गानें फिरत असत.

यांना बोलण्याचा अतिशय नाद असे. हे कधीं ह्मणून एक दोन मिनिटें दिवसांतून मुकाट्यानें बसलेले कोणास दिसले नाहींत. यांची भाषा सरळ नसे, परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं असें नव्हतें. मात्र हें खरें कीं, विचारी व सुज्ञ पुरुषावांचून कोणालाही त्यांतील गर्भितार्थ काढतां येत नसे. हे कोणाशींही सरळ प्रश्नोत्तरें करीत नसत. परंतु प्रश्नकर्त्याच्या मनांतील आशय मोठ्या चमत्कारिक रीतीनें आपल्या भाषणांतून दाखवीत असत. कधीं कधीं यांनीं सरळ बोध आणि प्रश्नोत्तरें हीं करावीं. हे स्पष्टवादी असून पूर्ण निस्पृह होते.

"आशा तृष्णा माया, अपमानाचें बीज । नासिलिया पूज्य, होय जगीं"

या उक्तीप्रमाणें आशा, तृष्णा, माया, मान, अपमान यांचें बीजच यांनीं जाळून भस्म करून टाकिलें होते, यांत शंका नाहीं. पर्जन्य, शीत व उष्ण काळांतही त्यांची एकच स्थिति रहात असे. ह्मणजे यांच्या अंगावर कधीच कपडा रहात नसे. उष्ण काळांत ऐन दोन प्रहरीं भर उन्हांत हे अनवाणी रस्त्यानें फिरत असत. शीत कालांत कोणी कांहीं कपडा दिल्यास पांच मिनिटेंसुद्धां तो अंगावर ठेवित नसत. ते तो कोठेंही टाकून देत असत. एक कौपीन मात्र कायम असे. तथापि कधीं कधीं तिच्यावरही गदा येई. श्रीयुत् एकनाथ अनंत ऊर्फ अण्णासाहेब बारशीकर मुख्य कारभारी, संस्थान श्री एकनाथ पैठण,

यांनीं सांगितलें कीं, मी सीत कालांत औरंगाबादेस होतों. एके दिवशीं सकाळीं अति थंडी पडली होती. त्या वेळीं बाळकृष्णरावजींची दिगंबर मूर्ति तेथें आली आणि "थंडी वाजती ×××× ! रांड पाजी आहे" म्हणून त्यांनीं माझें उपरणें घेतलें, व गार पाण्यांत भिजवून न पिळतां तसेंच तोंडावरून व अंगावरून पांघरून घेऊन दीड तास रुद्र म्हणत बसले, व उपरणें तेथेंच टाकून चालते झाले. एखादे दिवशीं महाराज गळ्यांत एक चिंधी बांधीत असत, व त्यास जानवें आहे असें म्हणत असत. कधीं कधीं ते चिंधीचे गांठीस हें लिंग आहे असेंही म्हणत असत. यांच्यापुढें खाण्यासाठीं कोणताही पदार्थ–मग तो कडू, गोड, खारट, तुरट, तिखट, आंबट, कसाही असो–ठेवला ते म्हणजे खात असत व तो खातांना वृत्ति आनंदित दिसे. कडू कारल्याच्या भाज्या शिजवून नुसत्यासुद्धां छलक लोकांनीं त्यांच्यापुढें ठेवलेल्या, आणि ओल्या मिरच्या आणून टाकलेल्या त्यांनीं खाऊन तृप्त झाल्याचीं उदाहरणें बरींच आहेत. यांनीं मोरीचें घाणेरडें पाणी ओंजळीनें प्यावें. आणि ते पितांना मोठ्या संतोषानें 'गंगामाय' 'गंगामाय' असे शब्द दीर्घ स्वरानें उच्चारावे, हें सर्व शहरांतील लोकांनीं नित्य पाहिलें आहे. "गंगागुरुबाई माझे आई, मजला ठाव द्यावा पायीं" असेंही हे म्हणत असत.

ओव्या.

तृषा लागतां मोरीवरी । जाऊनि तेथें जान्हवी तीरीं ॥
आलों म्हणोनि वर्णन करी । तें नीर प्राशी नंतर ॥ १ ॥
प्राशितां जलाची ओंझोळी । येतसे आनंदाची उमाळी ॥
म्हणे हें गंगाजल जाळी । अंतर्बुद्धि दुष्ट ती ॥ २ ॥
शुद्ध करिते अशुद्धास । मुक्त करिते भवबद्धास ॥
अनंत पातकांचा नाश । खास होतो जाण वा ॥ ३ ॥
ऐसें बोलतां जन हंसे । अमंगल क्रिया न बरि त्यां दिसे ॥
म्हणती हें मनुष्यपण कसें ॥ असें भ्रांत चित्त हें ॥ ४ ॥
चामरासि म्हणे ती केरसुणी । खऱ्या हिऱ्यास कांचमणी ॥
अज्ञानांधःकारांतूनी । खरें काय दिसावें ॥ ५ ॥

ज्याचें अंतःकरण निर्मळ ॥ त्यासी सर्व दिसें गंगाजळ ॥
जेथें मंगलामंगल । एकरूप वसतसे ॥ ६ ॥
बाह्य अंतर एकरूप ॥ विश्व दिसे ज्या ईशस्वरूप ॥
स्वप्न कैसें नसतां झोंप । निर्मळ जागृती सदां त्या ॥७॥
ज्यासि समान रंकराव । नाहीं ज्यासि दुजाभाव ॥
स्थिरचर अवघा वासुदेव ॥ जयाच्या ठायीं सर्वदां॥ ८ ॥
बाह्य मूर्ति दिसे वेडी ॥ अंतरस्थ विद्या जाडी ॥
ह्मणोनी भवपाशा तोडी ॥ न कळे गोडी अज्ञाना ॥ ९ ॥

अशी महाराजांची वृत्ति त्या अव्यक्त निराकार ब्रह्मतेजाशीं निराकार जाहलेली असतांना, संसारांतील त्रिविध तापांनीं त्रस्त झालेल्या आह्मां सर्वांस त्यांची ओळख पटली नाहीं. बाळकृष्णमहाराज हे सुखदुःखांनीं तप्त अशा अंतःकरणवृत्तीला निमिषांत शांत करणारें असें अत्यंत सुगंधिक व अमृतानें डबडबलेलें एक सरोवरच होतें. परंतु सर्व औरंगाबादकर मंडळी त्यांना वेडा बाळकृष्णच म्हणत असत. त्या ब्रह्मवेड्याच्या दृष्टीला मात्र अज्ञानतिमिरांत शिरून अनिष्ट मार्गानें जात असलेलें बाकीचें जगच वेड्यासारखें दिसत असलें पाहिजे. ह्या विदेहस्थितींतील महाराजांची वृत्ति

" ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः "

अशा प्रकारची होती. ज्यांनीं घाणेरडें मोरीचें पाणी " गंगा माय" ह्मणून प्राशन करून आपली तृषा तृप्त करावी, ती एकाच वेळीं नाहीं तर सदां सर्वदां. असें असून त्यांना त्यापासून केव्हांही बाधा अथवा कोणत्याही प्रकारचा विकार झाल्याचें कोणीं ऐकिलें आहे काय? मोरीच्या घाणीपासून आपलें आरोग्य विघडतेंना? आपणांस वक्तशीर खाण्यास मिळालें नाहीं, एखादे वेळीं रात्रीं निद्रा पूर्ण झाली नाहीं, तर आपली प्रकृति किती लवकर विघडते? परंतु त्यांच्या प्रकृतीस विकार झाल्याचें त्यांच्या हयातींत एके दिवशीं तरी कोणी ऐकिलें आहे काय? त्यांना कधीं उष्णतेपासून श्रम, पर्जन्यापासून त्रास व सीतापासून दुःख झालेलें कोणी पाहिलें किंवा ऐकिलें आहे काय? त-

स्मात् देहाभिमान सोडवर व त्याची पर्वा न बाळगल्यावर ईश्वर त्याचें कसें संरक्षण करतअसतो, हें आपणासारख्या अज्ञानजनांस कळण्यासाठीच महाराजी विभूति प्रभूंनीं निर्माण केली असावी, असें विचारी मनुष्यास टल्यावांचून राहणार नाहीं.

कित्येक दिवस कायरंतु बहुतेक वर्षपावेतों औरंगाबादकर मंडळीस या विभूतीची पूओळख पटली नाहीं. त्यांनीं त्यांना पूर्ण वेडा करून टेविलें होतें. यीं कधीं लोकांना यांच्या बोलण्याचा व्यवहारदृष्ट्या निश्चयात्मक नुभवही येत असे व त्यांचे अमानुष चमत्कारही दृष्टीस पडत अ. ते पाहून त्यांनीं आश्चर्यचकित व्हावें. परंतु मायेचें पटल त्यांच सद्बुद्धीवर तरीदिशीं उतरावें आणि त्यांनीं महाराजांस वेडा, पिसा, हकलेला, मेंदुफिऱ्या, अशा विशेषणांनीं पुन:पुन: दूषण द्यावें. कित्ते अल्लड मुलांनीं व उद्दाम, तरुण, छचोर व हलकट लोकांनीं त्यांचं थट्टा व कुचेष्टा कराव्यात व त्यांच्या मागें लागून त्यांस फार त्रासद्यावा. कधीं त्यांना मारावें, त्यांची लंगोटी ओढावी, अगर फेडूनही ावी. औरंगाबाद शहर मुसलमानी वस्तीचें असल्यामुळें यवनांच्या मुंचे थवेच्या थवे यांच्यामागें हुतूतू करीत लागत असत. केव्हां केव्हमहाराजांच्या अंगावर हे थुंकतसुद्धां असत.

शके १८०९ सालांत, रंगाबादच्या सुभेदारीच्या जागेवर अली जनाब नवाब मुक्त दरजसाहेब बहादुर विराजमान होते. औरंगाबादच्या सुभेदार साहेबांस रकारांतून फार मोठा मानमरातब, हत्ती, अंबारी वगैरे आहे. त्यांचा सलामास जाणें झाल्यास कंबर बांधून हात जोडून अहस्तें कम जावें लागत असून फिरून त्यांना पाठ न दाखवितां तसेंच मा फिरावें लागत असतें.

वर सांगितलेले नावसाहेब फारच निर्मळ अंत:करणाचे असून, त्यांची या सत्पुरुषाचे ठिकाणीं उत्तम भक्ति असे. यांनीं सरकारांत काम चालवून बऱ्याच सत्पुरुषांची खाण्यापिण्याची व्यवस्था केल्याचीं उदाहरणें आमच्या इकडे अनेक आहेत. नवाब साहेबांना महाराजांचा काय अनुभव आला असेल, व त्यांच्याकडून काय चमत्कृति दृष्टीस

राहली असेल ती कोणास माहीत नाहीं; तु हे त्यांना अति पूज्य मानीत असत. आणि बाळकृष्णबुवाही त्यां कचेरींत, देवडीवर व घरीं नेहमीं जात असत. त्यांच्या घरांतण्याची त्यांना केव्हांही बंदी नसे. ते घरीं अगर कचेरींत गेले तर नबाब साहेबांनीं त्यांचा फार मोठा सत्कार करावा. नबाबसाहेबांचा विचार महाराजांस खाण्यापिण्यासाठीं तीस रुपये माहवार सरकारांतून करून द्यावी असा होता. परंतु ते इच्छाचारी असल्यामुळें त्याचा कांहींएक उपयोग होणार नाहीं असें लोकांनीं सांगितल्यावर तो बेत त्यांनीं रहित केला. नबाब साहेबांनीं सक्त ताकीद केली होती कीं, यांना कोणी त्रास दिला अगर छळलें, तर त्यास जाबत्याप्रमाणें शिक्षा होईल. असेंही ऐकण्यांत आलें आहे कीं, नबाब साहेबांनी खाजगींतून अशी एक सूचना शहरवासी लोकांस व मुख्यत्वेंकरून व्यापाऱ्यांस केली होती कीं, महाराजांच्या हातून कोणाची कांहीं नुकसानी झाली तर ती आम्हांस आणून दाखविली असतां आम्ही त्याची किंमत देऊं. एके दिवशीं नबाबसाहेब चार चाकांच्या गाडींत बसून चालले होते. मार्गांत बाळकृष्ण महाराज भेटले. त्यांनीं नबाबसाहेबांना उतरवून त्यांचा हात धरून बोलत बोलत पायांनीं दूरवर चालवीत नेलें. सारांश, महाराजांच्या कोणच्याही वचनास त्यांनीं कधींही मोडलें नाहीं.

पुढें लौकरच औरंगाबादकर हिंदुमुसलमानसमाजांत महाराजांसंबंधानें एक प्रकारची पूज्यबुद्धि उत्पन्न झाली, व लोकांस महाराजांकडून कांहीं अद्भुत चमत्कारही दृष्टीस पडूं लागले. कोणाचीं दुःखें व संकटें दूर होऊं लागलीं; त्यांच्या कृपाप्रसादानें कोणास चाकऱ्या लागूं लागल्या; त्यांच्या आशिर्वादेंकरून अन्नान्न झालेल्या लोकांस खाण्यापिण्याची चैन होऊं लागली; व अनेक प्रकारचे अनुभव येऊं लागले. कोणाचें दुखणें व मोठमोठे विकार त्यांचा हात लागतांच जाऊं लागले. तेव्हां महाराज हे वेडे नसून ते सत्पुरुष आहेत, अशी त्यांची कीर्ति सर्व शहरांत लौकरच पसरली. मग काय विचारावें? शहरांतील लोक श्री बाळकृष्णमहाराजांस भक्तीनें व प्रेमानें वंदी, जि·

लड्या, लाडू, अशीं अनेक प्रकारचीं पक्वान्नें, फराळाचें आणि फळफळा- वळ वगैरे आणून देऊं लागले; व सर्वांची अशी इच्छा असे कीं, आपण आणलेल्या पदार्थांतून महाराजांनीं एखाद्या घांसाचा तरी स्वीकार करावा.

आम्ही प्रापंचिक या वीतभर पोटासाठीं रात्रंदिवस किती असह्य कष्ट करतों, परंतु आह्मांस वक्तशीर चटणीरोटीसुद्धां खाण्यास मिळत नाहीं; व महाराजांची कांहींच खटपट नसतां आणि त्यांना गरज नसतांनाही, व ते नको नको म्हणत असतांना, आयतीं पक्वान्नें त्यांच्यापुढें येऊं लागलीं.

" ज्याचा सखा हरी, त्यावर विश्व कृपा करी ॥
उणें पडूं नेदी त्याचें, वारें सोशी आघाताचे ॥
तयाविण क्षणभरीं, कदा आपण नोहे दूरी ॥
अंगा आपलें ओढोनी, त्याला राखे जो निर्वाणीं ॥ "

ही नामदेवउक्ति आहे. अशी महाराजांची स्थिति होती.

सर्व शहरवासी आबालवृद्ध श्रीगुरूंची प्रेमबुद्धि आणि निःसीम भक्ति यांच्या ठिकाणीं वाढत चालली. महाराजांच्या स्थितींत मात्र कोणत्याही प्रकारचा फेरबदल बालाग्रही झाला नाहीं. यांना शालीची किंवा कंबलेची किंमत कांहींच नसे; तशीच मिष्टान्नाची व कदान्नाचीही त्यांस पर्वा नसे. जे सदा सर्वकाळ विदेहस्थितींत, ज्यांना आपले देहाचीच खबर नाहीं, ते देहाच्या पोषक वस्तूंची काय दाद घेणार ? महाराज थोडेच दिवसांत शहरवासी लोकांचे भक्तिभाजन बनले. कित्येक लोकांना त्यांना दिवसांतून एकदां तरी पाहिल्यावांचून करमेनासें झालें. शहरांतील लोकांनीं महाराजांचें नांव 'देवा' असें ठेविलें व कांहीं त्यांना महाराज असेंही ह्मणत असत. सारांश, या वेळीं अन्नपूर्णा देवी तर त्यांना क्षुधेची बाधा यत्किंचितही होऊं नये ह्मणून नेहमीं त्यांच्या मागोमाग आहे कीं काय, असें वाटत होतें.

महाराजांचा स्वभाव सर्वकाळ शहरांत फिरण्याचा असे. त्यांनीं नेहमींच फिरत रहावें; कारण, त्यांना इतर साधूप्रमाणें मठ वगैरे कांहीं-

च नव्हते. यांचा मठ विश्वालय; त्यांचें आंथरूण भूमंडळ; पांघरूण स्वच्छ, निर्मळ, नीलवर्ण आकाश; टेकण्यास मोठमोठाले वृक्ष; उशास धोंडे व परिधानांवर अष्ट दिशा. ज्याला कालांतरींही संगदोष आणि नाश नाहीं अशा प्रकारचें हें यांचें सामान नेहमीं सिद्ध असे. महाराजांनीं हमेषां गालिप्रदानरूप जप करीत असावा. महाराजांच्या शिव्यांचा प्रभाव व चमत्कार लोकांत असा झाला कीं, कोणी कार्यार्थी महाराजांकडे गेला, आणि त्यांनीं त्यास पाहतांच शिव्या दिल्या, म्हणजे त्याचें जें कार्य असेल, तें निःशंकपणें व्हावयाचेंच एखादे वेळीं त्यांनीं मारिलें तर कसलेंही बिकट संकट, अपरिहार्य दुःख, व कसलेंही कठीण कार्य असल्यास तें पूर्ण झालेंच पाहिजे, असा सिद्धांत ठरला होता; व त्याप्रमाणें हजारों लोकांस या प्रांतांत अनुभव आले आहेत, म्हणून ही गोष्ट सर्वप्रसिद्धच आहे. हे कधीं मांडी घालून किंवा पाय पसरून बसलेले कोणाच्या दृष्टीस पडले नाहींत.

वरचेवर साहूसावकार, अमलदार, जहागिरदार, वकील वगैरे सर्वच लोक यांच्यावर अति भक्ति करीत असत. व महाराजांच्या तोंडांतून जीं अक्षरें निघत तीं स्वतः झेलण्यास ते तयार असत.

सर्व जातींतून महाराजांची सारखी प्रीति वाढत चालली. हे पूर्ण निस्पृह असल्यामुळें यांना द्रव्याची, कपड्यांची व अलंकारांची मुळींच पर्वा नसे. तेव्हां लोकांनीं महाराजांसाठीं कांहीं खाण्याचे पदार्थ मात्र उत्तम तयार करून आणावे. परंतु त्यांचीही महाराजांस गरज नव्हती. एखादे वेळीं कोणी कांहीं उत्तम पदार्थ यांच्यासाठीं तयार करून आणला तर ते तो खात नसत, परंतु आनंदानें कुत्र्यास खाऊं घालीत. तो असेपर्यंत त्याच्या पाठीवरून हात फिरवीत असत महाराजांस नवस केला तर ब्राह्मण भोजनावांचून कांहीं चालत नसे.

सन १३०४ फसलींत एका हैद्राबादकरानें महाराजांस असा नवस केला कीं, माझें कार्य झाल्यास मी त्यांना उत्तम वस्त्रालंकारांसह वाद्यांच्या गजरांत सर्व नगरांतून समारंभानें फिरवीन. पुढें त्याच्या इच्छेप्रमाणें कार्यभागही झाला. नवस फेडण्याची त्यानें बरेच दिवस खटपट केली,

परंतु यत्न सिद्धीस गेला नाहीं. आपला नवस फेडण्याकरितां महाराजांस कसें मिरवावें, गाडींत, घोड्यावर, म्यान्यांत अगर पालखींत ते बसणार नाहींत. जबरीनें बसविल्यास उडी टाकतील, अगर काय करतील याचा नियम नाहीं. तेव्हां काय करावें, अशा विचारांत तो पडला. नंतर असा बेत ठरला कीं, कांहीं मंडळींनीं जमून त्यांना धरूनच मिरवावें. परंतु ते हातीं कसे लागतील, अशा काळजींत तो असतां त्याला असें कळलें कीं, बाळकृष्ण महाराज पाराजी हालवायाच्या द्वारें हातीं लागतील.मग त्याला धैर्य येऊन त्यानें पाराजीच्या विचारें मिरवणुकीचा दिवस ठरविला. व त्या दिवशीं कांहीं मंडळी जमविली, आणि त्यांना पाराजीच्या दुकानीं गांठलें. त्या दिवशीं पाराजीनें महाराजांचा श्मश्रु वगैरे करवून मंगलस्नान घातलें. व पुढें वर्णन केल्याप्रमाणे प्रकार घडून आला :—

साक्या.

नेसविला मग धोतरजोडा त्यांना रशिमकाठीं ।
पागोटेंही पैठणि घालुनि बैसविलेसें थाटीं ॥
नटला साधु तो नवसें ॥ भक्तासाठीं हा गवसें ॥ १ ॥
अंगरखा सुंदर अंगामधिं वर्ण तयाचा लाल ।
पोपटरंगी वरुनि घातली पांघरण्याला शाल ॥
नटला साधू तो नवसें० ॥ २ ॥
गळां तूळशीरुद्राक्षांच्या माळा घालिती फार ॥
हस्तांमाजीं गजरे बांधुनि पुष्पांचेही हार ॥
अर्पिति त्या कंठीं ॥ शोभे अंगुलांत अंगठी ॥ ३ ॥
पदकमलांमधिं चर्मी जोडा नरम अतीशय साधा ॥
बाधा जाईल भवरोगाची निजहित आपुलें साधा ॥
घेऊन दर्शन हो ॥ प्रार्थी पापस्पर्श न हो ॥ ४ ॥
सुंदर मूर्ति सतेज ऐशी शृंगारामधिं कोणी ॥
कधीं पाहिली नव्हती स्वप्नीं शहरवासी लोकांनीं ॥
नटला साधू तो नवसें० ॥ ५ ॥

भव्य कपाळीं मळवट जैसा गंध फासिलें ज्याचें ।
वर्णन लिहिण्या समर्थ नाहीं लेखनि त्या तेजाचें ॥
घेऊन दर्शन हो० ॥ ६ ॥
धूप दीप आणि नैवेद्यातें अर्पुनि तांबुल हातीं ।
देऊनि आरति करिती सारे मंत्रपुष्प मग वाहती ॥
करुनी नमनाला ॥ साधू रस्त्यावरि आणिला ॥ ७ ॥

अशा प्रकारें त्यांना जबरीनें शृंगारून, दहावीस मंडळींनीं त्यांच्या दोन्ही दंडास धरून, त्यांना राजमार्गावर आणिलें. चौघडे व वाजांचे गजर चालू झाले. ही वार्ता सर्व गांवांत पसरली. लोक भराभर जमले. बरोबर समुदाय बराच जमला होता. अशा थाटानें चौकांतून, सराफ्यांतून वगैरे त्यांस मिरवीत नेलें. बाळकृष्णमहाराजांचा अशा प्रकारें मिरवत निघण्याचा औरंगाबादेस हा पहिलाच प्रसंग होता. व ते हळुहळु चालतांना लोकांना आजपर्यंत कधीं दिसले नव्हते, परंतु या वेळीं तो योग आला. ह्मणून हजारों पुष्पमाळा त्यांच्या गळ्यांत पडल्या. ओझ्यामुळें त्या कांहीं मंडळी काढून टाकून प्रसाद ह्मणून वाटीत असत. कित्येक लोक यांच्यावर गुलाल, बुक्का, व पुष्प उधळीत असत. केव्हां केव्हां मधून मधून इतक्या समुदायांतूनही ही मूर्ति निसटून जाण्याचा प्रयत्न करीत असे. परंतु सर्वत्र मंडळीनीं यांना धरून चालविलें होतें ह्मणून यांचा इलाज चालला नाहीं. अशा रीतीनें महाराज तीन घंटे मिरविले. त्या सद्गृहस्थाचें मोठें भाग्यच समजलें पाहिजे कीं, हे बाळकृष्णबुवा त्याचे हातीं लागून हा मिरवणुकीचा समारंभ त्यांनीं पार पडू दिला. नाहीं तर हे स्वेच्छाचारी हातीं कोठून लागणार ?

असो, मिरवणें होतांच जसा एखादा बिगारी जबरीनें डोक्यावर दिलेलें ओझें मुक्कामाला नेऊन टाकून देऊन मोकळा होतो, त्याप्रमाणें महाराजांनीं आपल्या अंगवरील वस्त्रभूषणांचें ओझें उतरून टाकून तीं वस्त्रभूषणें वगैरे त्यांनीं मनाला वाटले त्याला देऊन टाकिलीं आणि पूर्व स्थितीस अनुसरून म-

हाराजांची दिगंबर मूर्ति पुनः नेहमीप्रमाणें शहरांत फिरण्यास लागली. यानंतर अनेक प्रसंगीं पुष्कळांनीं त्यांना मिरविण्याचा विचार व यत्न केला, परंतु तो कोणासुच सिद्धीस नेतां आला नाहीं.

महाराजांस कोणत्याही जातींत, कोणत्याही ठिकाणीं जाण्याची, व कोणाच्याही घरांतून कोठेंही फिरण्याची मनाई नसे. ते मुसलमानांच्या घरांत जात असत. ब्राह्मणाच्या घरांत, देवघरांत, स्वैंपाघरांत इच्छेस येईल तेथें जात असत, व वाटेल ती वस्तु वाटेल त्या ठिकाणीं ठेवीत असत. पुढें पुढें तर शहरवासी जनांची यांच्यासंबंधानें इतकी पूज्यबुद्धि झाली कीं, त्यांना पाहतांच लोकांना अत्यानंद होई. यांची लीला पाहण्यांत ते कामकाज सोडून प्रहरप्रहरसुद्धां निमग्न होत असत. हे कोणाच्या घरीं गेल्यास त्यांना आपलें सद्भाग्य उदय पावलें, असें वाटत असें, व त्यांची सुश्रुषा ते मनोभावानें करीत असत. कोणी महाराजांस सुगंधी तेलें लावावीं, कोणी स्नान घालावें, कोणी घांस भरवावेत, कोणी तिलक करावा, कोणी पाय दाबावे, वस्त्रें नेसवावीं—घालावीं, असा थाट नित्य चालू असे.

औरंगाबाद हें सिमती डिव्हिजनचें ठिकाण आहे तेथें मीर अदालत कचेरी ( सेशन कोर्ट ), सुभेदारी ( कमिशनर कचेरी ), वगैरे असल्यामुळें बीड, नांदेड, परभणी, औरंगाबाद या चारी जिल्ह्यांतील लोक सरकारीदरबारी कामासाठीं येथें नेहमीं येत असतात. त्या बाहेरून आलेल्या मंडळींनीं महाराजांना पुष्कळसे नवस करावे. खरोखर महाराज एकाच ठिकाणीं बसणारे असते, तर रोज पेढेबर्फी, खारीकखोबरें, कपडालत्ता, फळफळावळ इत्यादि किती येते याचा अदमास तरी करतां आला असता. महाराजांनीं कोणाजवळ तपकिरीची डबी अगर बेलें पाहिलें ह्मणजे त्यापासून तीं त्यांनीं मागून घ्यावींत, आणि त्या डबींतील सर्व तपकीर ओढावी, शिलकेंत कांहींच ठेवू नये. एके वेळीं छलक मंडळींनीं यांना पावशेर तपकीर आणून दिली. ती त्यांनीं सर्व तत्काल ओढिली.

महाराज विडा कुटल्यावांचून खात नसत; व तो विडा गंगेचें भ-

जन करीत स्वतः तीन तीन ठेक्याचे तालावर कुटीत असत. तब-कांत अगर पानदानांत जितक्या वस्तु असतील, तितक्या विड्यांत घालीत असत. तबकांत तंबाकू असली-तरी घालावी,तपकीरीची डबी असल्यास तींतून तपकीर काढून तीही घालावी, आणि कुटून तेथें जी मंडळी बसली असेल त्यांस आर्धा तो विडा द्यावा, नंतर आपण भक्षण करावा. परंतु तंबाकू न खाणारांस त्यानें कधींच वांती अगर तळमळ झाली नाहीं. उलट या विड्यानें कित्येकांचीं दुखणीं गेल्याचींही उदाहरणें आहेत.

औरंगाबादेस बनेमिया नांवाचे अवलिया यांच्या वेळेपासूनच आ-हेत. त्यांचीही पिशाचवृत्तिच आहे. त्यांची व महाराजांची भेट नेह-मीं होत असे. हे उभयतां एके ठिकाणीं भेटले ह्मणजे त्यांनीं मोठमो-ठ्यानें घटाघटा उगीच हंसावें, भेटावें, आणि प्रहरप्रहरपर्यंत कांहीं चमत्कारिक बोलावें. त्या वेळीं त्यांची भाषा कोणती चालत असे, हें मात्र समजत नसे. हे अवलिया अजून पावेतों औरंगाबादेस सुभेदार साहेबांच्या देवढीमागें आहेत.

काशीराम बजाज, मोहनदास कोठीवाले, रामाजी बजाज, यांचीं कपड्याचीं दुकानें चौकांत आहेत, त्या ठिकाणींही महाराज बसत अ-सत. महाराजांच्या कृपेनें यांचें भाग्य उदयास आलें आहे, असें सर्व शहरांत प्रसिद्ध आहे. येथील कपड्यांचीं ठाणेंच्या ठाणें फाडलीं अगर यांनीं कोणास दिलीं, तर यांना ते कांहींच म्हणत नसत. महाराजांचा स्वतंत्र संग्रह कांहींच नसे. त्यांना नवसाचे धोतरजोडे, उपरणीं, पागो-टीं, वगैरे पुष्कळ लोक देत असत. परंतु त्याचा त्यांना यत्किंचितही उपयोग आणि उपभोग होत नसे. इतर मोठ्या निस्पृह साधूपाशीं नि-दान एखादा सोटा, फेटा, लोटा आणि कडासन तरी असतें. परंतु यांच्यापाशीं तें देखील कांहींच नव्हतें. महाराज जेव्हां लोकप्रिय झा-ले, तेव्हांपासून हे बाजारांत फिरतांना फारच मोठा थाट होत असे. लोकांचा भाव यांच्या ठिकाणीं दृढ झाला होता, आणि असाही अनु-भव आला होता कीं, यांनीं आपल्या विक्रय वस्तूंस हात लाविला ह्म-

णजे, अथवा एखादी त्यांतून घेतली तर, त्यांपासून लौकर विक्रय हो-ऊन आपलें निश्चयानें हित व कल्याण होतें. यासाठीं ते फिरत असतांना, प्रत्येकानें आपल्या दुकानावर त्यांना बोलवावें. त्यांचा हात धरून त्यांस घेऊन जावें. कांहीं फळफळावळ घेऊन त्यांच्यामागें पळत सुटावें. मुलांचा समुदाय त्यांच्या मागें खाण्याला मागण्यासाठीं असावयाचाच या थाटाचें अल्प वर्णन पुढील कटिबंधांत दिलें आहे.

## कटिबंध.

बाळकृष्ण राया, नमा तुह्मि बाळकृष्ण राया ॥ ध्रु० ॥ आसन नाहीं, वसनहि नाहीं, व्यसनहि नाहीं, खाण्याचेंही, यापरि मूर्ति शुद्धविदेही, नाहीं सोटा, नाहीं फेटा, आणि लोटा, बोटाइतका, चिरगुट तोटा, वैभव ज्यांचें एक लंगोटा, केव्हां केव्हां त्यासिहि फांटा, परंतु नाहीं कांहीं तोटा, कारण जेथें अनंद मोठा, दृश्य पसारा सारा खोटा, सिद्धांताचि हा जेथें ऐसा, तेथें कैसा टिकेल पैसा, इथें नये माया, कधिं ती इथें नये माया, नमा तुह्मि बाळकृष्णराया ॥१॥ बाजारांतुनि साधुमूर्ति, केव्हां केव्हां जेव्हां निघती, बागवान [illegible] घेउनी, पळे मागुनी, महाराजांना मिळे [illegible]उनी, हातांत त्यांच्या केळे देउनी, वळे दुकानीं, मुलांस देती सगळीं फेकुनी, कोणी म्हणती चला मकाणीं, बोलुनि ऐसें धरिती हातां, त्यांच्या बाजारांतुनि जातां, गंधी संधी साधुनि येती, [illegible] चंदनअत्तर सुहाग अंबर, नंबर एकचें शंभर प्रकार, [illegible] फार काढिती, वेग वेगळे, केश मोकळे, थोडे होते त्याला लाविति, बाकी अंगा-फांसुन देती, गंधि अळीतिल माळि फुलारी, दुरी पाहतां, करीं घेउनी, त्वरें पोंचती, फुलजाळीचे, रुमाल आणि कमालखाणी, मोठ्या माळा महाराजांच्या गळा समर्पुनि, देवा घ्या घ्या, ऐशा गजरें, गजरे अदरे, हुंगण्या सुंगण्या, हातांत देती फुलें उधळती, मुलें अनंदें मागें पळती, आह्मांस द्या द्या ह्मणूनि छळति, अळीअळींतील तांबोळी ते, विड्यास हातीं घेउनि धांवति, वेगवेगळे पदार्थ सगळे दुकानवाले घेउनि येती, महाराजांना गरज नसोनी, अर्ज करीति हात जोडुनी

स्वीकार व्हावी, नकार करितां, येईल दुरिता, दुःख ताप तें, आपण हारितां, हात लागतां, विपुलचि होतें, ऐशी सत्ता, आपुली असतां, दीनानाथा, अशा अनाथां, ऐसें छळतां, पुढती पळतां, काय म्हणावें, कोठें जावें, देणें आह्मां, इतुकें द्यावें, अह्मीं आणिलें जें तें घ्यावें, यापरि प्रार्थिति, अतितर भावें, एसें झालें कधींच नच या, महाराजांचें मन वळवाया, केले प्रयत्न जाती वांया, जनहो सदा तुह्मी गा या, सदा तुह्मी गाया० ॥२॥ भाजीवाले, हांजी हांजी, करूनि राजी, करण्या पाहति, हाला साजी, शाक भाजीच्या हातघालण्या, महाराजांचा हस्त लागतां, ह्मणती खपेल हां हां ह्मणतां, बरकत येण्या हरकत नाहीं, परंतु मूर्ति सरकत नाहीं, राई इतुकी ती चतुराई, नाहीं चालत तेथें कांहीं, जेथें खरीच बेपरवाई, तेथें येती ते हलवाई, पेढे बर्फी पुढें ठेविती, नवसी जन ते पुढें आणिती, मुलां लेंकराकडे पाहुनी, प्रेमळ वचनें गडे खाऊनी, घ्या हा खाऊ, आणा भाऊ, आणी बहिणी, ऐकत बसतां काय कहाणी, प्यावें पाणी, जावें येथुनि, ऐसें बोलुनि, निघे तेथुनी, रिघा शरण पायां, जनहो रिघा शरण पायां ॥ ३ ॥

महाराज इच्छेस आल्यास कोणाच्या दुकानांतही जात असत. यांचा स्वभाव दुकानांतील वस्तु इकडच्या तिकडे, व तिकडच्या इकडे, व्यवस्थेनें लावून ठेवण्याचा असे. पण त्यांच्या कृत्यास कधींच कोणी हरकत करीत नसे. उलट महाराज दुकानांत आले म्हणजे लोकांनीं आनंद मानावा, व आपलें कांहीं शुभ आहे असें ह्मणावें. महाराजांकडून बहुतकरून कधींच कोणाचें नुकसान होत नसे. एखादे वेळीं जाणूनबुजून ते नुकसानही करीत. परंतु त्याबद्दल यांच्यावर कोणी त्रागा अगर राग केला नाहीं. उलट नुकसान झालें ह्मणजे चौपट फायदा होईल असें समजत असत; व याप्रमाणें कित्येक लोकांना अनुभवही आले आहेत.

यांचा फोटो घेण्यासाठीं कित्येक फोटोग्राफरांनीं पुष्कळ प्रयत्न केले. परंतु बरींच वर्षें त्यांचा यत्न सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं पाराजी हालवायाच्या द्वारें यांना गांठून श्रीयुत रा. रा. तात्यासाहेब

सोद्दनी, मोद्दतमीम, आर्ट स्कूल, औरंगाबाद, यांनीं फार दिवसांच्या प्रयत्नांनीं तो घेतला व दुसरा एक फोटो रा. रा. केशव दीनानाथ फोटोग्राफर यांनीं घेतला.

---

# भाग तिसरा.

महाराज एकदां तंबाकुवाल्याच्या दुकानावर जाऊन तंबाकूच्या जुड्या इकडून तिकडे करीत असतांना चंदूजी नांवाच्या कसबिणीच्या येथील एक दांडगा मुसलमान तेथें होता, तो महाराजांस ह्मणाला: 'महाराज तंबाकू खाते?' ते ह्मणाले, 'बरें खाऊं.' त्यानें दीडपाव तंबाकू घेतला होता, तो आपल्या पांघरच्या रुमालांत बारीक करून त्यांच्या समोर ठेवला व 'इतना खाना चाहिये' ह्मणून थट्टेनें ह्मणाला. आणि पुढें काय करतात ही गम्मत पहात उभा राहिला. महाराजांनीं रुमालांतील तंबाकूच्या फक्यावर फक्या मारून तो सर्व खाल्ला, आणि रुमाल फेंकून देऊन उठून गेले. हें पाहून त्या मुसलमानास महाराजांची भलती थट्टा केल्याबद्दल फार वाईट वाटलें.

श्रीयुत रा. रा. रामरावजी भाऊ साहेब देशपांडे, आंबेकर, शिरस्तेदार, सदर अदालत, औरंगाबाद, इलाखे मोगलाई, हे महाराजांच्या प्रेमळ भक्तांतील आद्य भक्त आहेत. आज महाराजांच्या समाधीसंबंधानें जें कार्य झालें आहे, तें यांच्याच मेहनतीचें व परिश्रमाचें फळ आहे. यांनीं या कामांत अतिशय मेहनत घेतली. स्वतः शक्यनुसार यांत द्रवाही घातलें व बाहेरची पट्टी यांनींच जमा केली. यांची खटपट तेथें सभामंडपादि होण्याची चालू आहे. यांच्या उद्योगास ईश्वर साह्य करो, हीच आह्मी जगन्नियंत्यापाशीं प्रार्थना करितों. हे ह्मणाले, महाराजांसंबंधानें मला पुष्कळ चमत्कारिक अनुभव वेगवेगळे आले आहेत, व दुसऱ्यांसही आलेले मी पाहिले आहेत. बाळकृष्ण महाराजांसंबंधानें माझी पक्की खात्री झाली कीं, हे जे आपल्या तोंडांतून शब्द काढतील ते सिद्ध होणार आहेत. ते कालांतरींही चुकणार नाहींत.

सन १२९२ फसलींत मला मोठें दुखणें झालें होतें व मी वरींच औषधें घेतलीं, परंतु दुखण्याचें पाऊल पुढेंच असे. एके दिवशीं महाराजांनीं कुटलेला विडा मला दिला आणि दुसरे दिवसापासूनच माझा आजार कमी झाला. लवकरच मी वागूं फिरूं लागलों. पुढें चार पांच दिवसांनीं पुन: महाराज घरीं येऊन म्हणाले 'घोड्यावर खोगीर घाल आणि दशम्या कर.' तेव्हां त्या त्यांच्या भाषणाचा संबंध कांहींच माझ्या लक्षांत आला नाहीं. त्याच दिवशीं अस्तमानीं नाजम साहेबांचा हुकूम झाला कीं, उदईक सकाळींच परभणीस निघून जावें. सरकारी काम जरूरीचें आहे. तेव्हां मला वाटलें महाराजांनीं पूर्वीं हीच सूचना दिली आहे. सारांश, मी दुसरे दिवशीं निघून गेलों. आठ वर्षांपूर्वीं माझी वहीण क्षयरोगानें अतिशयित ग्रस्त झाली होती, तिची वांचण्याची आशा नव्हती. वैद्यांनीं हात टेकले होते. एके दिवशीं महाराजांनीं येऊन तिचें तोंडांत मारिली आणि 'उगीच पडून राहतेस! फिरत कां नाहींस? उद्यांपासून फिरत जा.' असें म्हणाले दुसरे दिवसापासूनच तिला चैन पडून त्या दुखण्यांतून ती उठली व अद्याप पावेतों ती सुरक्षित आहे. पुन: त्यांनीं असें सांगितलें कीं, एके दिवशीं अस्तमानी महाराज घरीं आले आणि म्हणाले कीं, 'तूं सतरावें दिवसापासून दोन रुपये रोज घेत जा.' या बोलण्याचा संबंध मला कांहींच कळला नाहीं. परंतु त्या दिवसापासून सत्राव्या दिवशीं मला साठ रुपये पगाराचा हुकूम झाला. त्यापूर्वीं मला पन्नास रुपये पगार असे. व हे साठ रुपये होण्याचा त्या वेळीं कांहीं संबंध नव्हता.

रा. रा. गंगाधर गोपाळ सिगेदार, फौजदारी मामलेदार कचेरी, औरंगाबाद, यांनीं असें सांगितलें आहे कीं, माझ्या घरीं प्रतिवर्षी भाद्रपदमासीं अनंतचतुर्दशीस रात्रीं कीर्तन होत असतें. महाराजांचा नियम असा असे कीं, त्या दिवशीं रात्रीं बरोबर नऊ वाजतां कीर्तनास यावें आणि कीर्तन झालें म्हणजे स्वत: भजन करावें व नंतर जावें. असा क्रम माझ्या आठवणीपासून त्यांच्या अंतकालापर्यंत बिनचूक आणि नियमितपणानें चालला असे. ते माझ्या घरीं बरोबर नवाचे

ठोक्यास येत असत. एके दिवशीं महाराजांनीं माझ्या तोंडांत मारून 'जा, तू आठ दिवसापासून कचेरींत नोकर रहा' असें सांगितलें व त्याचे आठवे दिवशींच यीं कचेरींत नोकर झालों.

श्रीयुत रा. रा. राजारामपंत बाबासाहेब तहशीलदार, परभणी, यांना महाराजांनीं एक पैसा काढून दिला. त्याच्या दुसरे दिवशींच ते बढतीच्या जागवर हैद्राबादेस गेले, व तहशीलदारींपर्यंत वाढून आतां-पर्यंत ते आनंदांत आहेत. तो पैसा अजून त्यांचे देवांत पूजस आहे. त्यांचे बंधु भगवंतरावजी आबासाहेब यांस महाराजांनीं भाकरीचा तुकडा दिला, त्याच्या तिसरेच दिवशीं त्यांना नोकरी लागली.

रा. रा. कैलासवासी श्रीनिवासरावजी नानासाहेब पेषकार, दुयम तालुकदारी, जिल्हा औरंगाबाद, हे एके दिवशीं कचेरीस जाण्याच्यावेळीं महाराजांच्या पायांवर मस्तक ठेवीत असतां ते ह्मणाले: ' शिवूं नको, मुडदा जळत आहे !' हें ऐकून त्यांना फार वाईट वाटलें आणि काय अनर्थ आहे हें कांहींएक लक्षांत आलें नाहीं. चवथेदिवशीं पत्र आलें त्या वेळीं महाराज तेथेंच होते. ते ह्मणाले: 'रडा, पत्र फोडा.' पत्र फोडून पाहतां त्यांत नानासाहेबांचे वडिलांस देवाज्ञा झाल्याचा मजकूर होता. महा-राज ज्या वेळीं मुडदा जळतो ह्मणून ह्मणाले त्याचवेळीं त्यांचा दहन-संकार सुरू असावा. कारण, त्या वेळेपूर्वीं एक तास नानासाहेबांच्या व-डिलांचें प्राणोत्क्रमण झालें होतें, असें पत्रांतील मजकुरावरून दि-सत होतें.

कै.वा. दिनकरराव देशपांडे पैठणकर यांनीं असें सांगितलें कीं, मी एके समयीं कांहीं सरकारी कामाकरितां औरंगाबादेस गेलों होतों. तेथें सराफ्यांतील एका माडीवर मी उतरलों होतों. महाराज रात्रीं तेथें आठ-वाजतां आले. पान वगैरे खाणें झाल्यावर मी महाराजांस फराळास उठण्याची प्रार्थना केली. गंगास्नान झाल्यावांचून फराळ करणें नाहीं, असें ह्मणून ते तात्काळ उठले, आणि जिन्याच्या दोन तीन पायऱ्या उतरू-न मोठ्यानें 'हर गंगे, हर गंगे,' असें दोन तीन वेळां ह्मणाले, व वर आले, तों सर्व आंग ओलें, स्नान करून पाण्यानें थवथबलेलें निथळत असलेलें

मी पाहिलें तेव्हां मी आपल्या उपरण्यानें ते पुसलें. जिन्यांत जाऊन पाहिलें तर पाण्याचा थेंबसुद्धां नाहीं; जवळपास कोठें हौदही नसे; व दोन मिनिटाच्या आंत हें कृत्य झालें, हें पाहून माझ्या मनाची स्थिति काय झाली ती सांगतां येत नाहीं. महाराज थोडा फराळ करून गेले. मला सारीरात्र झोंप आला नाहीं. कांहीं चमत्कारिक प्रकारची वृत्ति झाली, ती सांगता येत नाहीं.

रा. रा. जी. कृष्णराव, पोस्ट मास्तर, हल्लीं मु. पैठण, यांनीं असें सांगितलें कीं, मी एके वेळीं औरंगाबादेस असतांना गेंदाबाईच्याच घरीं उतरलों होतों. गेंदाबाई ही महान् साध्वी व भगवद्भक्त असून, हिचा सर्व काल स्नानसंध्या पूजाअर्चा वगैरेंत जात असे. दुसरीकडून आलेली साधुसंत मंडळी इच्या घरीं नेहमीं उतरत असत. ती त्यांना प्रेमानें आपल्याजवळ जें कांहीं असेल तें खाऊ घालून त्यांची मोठ्या भक्तीनें शुश्रुषा करीत असे. एके दिवशीं दोन प्रहरच्या वेळीं बाईच्या घरीं पांचचार साधु आले. बाईनें भाकरी आमटी तयार करून मलाही भोजनास उठविलें. इतक्यांत तेथें बाळकृष्ण महाराजही पोहोंचले. बाईनें त्यांना पाहून संतोषानें भोजनास बसण्याची प्रार्थना केली, आणि ह्मणाली: 'आज बरीच साधुमंडळी भोजनास जमली आहे, परंतु आमटींत घालण्यास मीठ नाहीं.' बाळकृष्ण महाराजांच्या हातांत एक लहानशी गाठोडी होती, ती त्यांनीं बाईच्या अंगावर फेंकून दिली. ती गेंदाबाईनें सोडून पाहिली, तों त्यांत आतपाव खडेमीठ निघालें. हें पाहून तिला अति आश्चर्य वाटलें, आणि ह्मणाली: 'अंतर्साक्ष बाळकृष्ण महाराजांनीं माझ्या घरीं मीठ नाहीं हें जाणून मुद्दाम भोजनाच्या समयीं ते घेऊन आले आहेत.' तिच्या नेत्रांतून प्रेमाश्रू आले. हे साक्षात् परमात्माच आहेत, ह्मणून ती अनन्यभावानें त्यांस शरण गेली. तें मीठ आमटींत टाकून सर्वांबरोबर महाराजांनीं भोजन केलें आणि चालते झाले.

के. वा. अच्युतराव वकील अंबेकर यांनीं स्वतः पाहिलेला चमत्कार एक वेळ आह्मास सांगितला. ते ह्मणाले: 'मी किराण्या चावडीपाशीं राहत

असतांना एके दिवशीं रात्रीं अकरा वाजण्याच्या सुमारास श्रीबाळकृष्ण महाराज तेथें आले. तेव्हां मी एका पक्षकाराबरोबर कांहीं प्रकरणासंबंधानें बोलत बसलों होतों, व कांहीं अंबेकर पाहुणे घरीं उतरले होते. दुसरे दिवशीं प्रातः ते जाणार होते, ह्मणून त्यांनीं आपआपल्या सर्व पडशा वगैरे भरून तयारी करून ठेवून ते तेथेंच बिछान्यावर झोंपलें होते. तोंच महाराज आले. त्यांनीं पान कुटलें आणि खाण्याच्या पूर्वी ह्मणाले, मला अंजीर खाण्यास पाहिजेत. मी ह्मटलें, 'भलत्याच वेळीं भलतेंच मागणें हें आपल्यासारख्या पूर्ण ज्ञात्यास कसें शोभतें? रात्र फार झाली आहे. या वेळीं अंजीर मिळणार नाहींत.' हें ऐकून महाराज उठले आणि एका पाहुण्यानें भरून ठेवलेली पडशी मजसमोर आणला व एक बंद असलेला पितळी डबा काढला. तो उघडला. त्यांत अंजीर भरले होते. हें पाहून मला चमत्कार वाटला. व मी ज्याची पडशी होती त्यांना जागें करून 'महाराज आले आहेत व तुमचे अंजीरही त्यांनीं काढले आहेत' असें ह्मणालों. पाहुण्यानें झोंपेंतून उठून महाराजांस पाहतांच साष्टांग नमस्कार घालून हात जोडले आणि ह्मणाला:'महाराज खरोखर अंतर्साक्ष आणि भक्तवत्सल व भक्ताची मनकामना पूर्ण करणारे आहेत. त्यांनीं एक एक अंजीर आह्मां त्रिवर्गांस दिला आणि आपण दोन खाल्ले. आणखी दिले असतां त्यांनीं घेतले नाहींत. नंतर स्वहस्तानें डबा लावला, व ते उठून गेले. ते उठून गेल्यावर पाहुण्यानें अति आश्चर्यानें असें सांगितलें कीं, मी आज सात वाजतां जेव्हां चौकांत अंजीर घेतले त्या वेळीं असें मनांत आलें कीं, यांपैकीं पांच अंजीर श्रीबाळकृष्णमहाराजांस समर्पण करावे व त्यासमयीं मी त्यांना शोधलेंही, परंतु भेट झाली नाहीं. यासाठीं मी हिरमुष्टी होऊन घरीं आलों. परंतु बाळकृष्णमहाराजांनीं माझ्या मनांतील हेतु या ठिकाणीं येऊन पूर्ण केला व त्यांच्यासाठीं अजिराचा संकल्प केल्याप्रमाणें पांचच अंजीर महाराजांनीं डब्यांतून काढले! हा केवढा भक्तवत्सलपणा आहे!

रा. रा. कृष्णाजीपंत जोशी, जोगेश्वरी छापखान्याचे मालक, हे हल्लीं

विडास असतात. त्यांनीं स्वतःचा अनुभव सांगितला. ते ह्मणाले: 'मी निजामशाहींत सरकारी नोकर असतांना परवशतेचा मनापासून तिरस्कार आला आणि हांजी हांजी करण्याचा त्रास झाला ह्मणून नोकरी सोडून द्यावी असा विचार मनांत आणिला. परंतु आपण कुटुंबवत्सल असून निराश्रित आहोंत, तरी चरितार्थ कसा चालावा, या विचारांत पडलों. विचारांतीं असा निश्चय ठरला कीं, छापखाना आणून त्यावर उद्योग करून निर्वाह करावा. हा संकल्प मी आपल्यावांचून इतर घरमंडळीसही कळूं दिला नाहीं. माझा भरंवसा श्रीबाळकृष्णमहाराजांवर पराकाष्ठेचा असल्यामुळें व या मार्गे चारपांच वेळां माझीं कांहीं न होणारीं कार्येंही महाराजांच्या बोलण्याप्रमाणें झाल्याकारणानें असें मनांत आलें कीं, औरंगाबादेस जाऊन महाराजांस आपला संकल्प कळवावा, व ते जशी आज्ञा देतील, त्याप्रमाणें करावें. असें ठरल्याप्रमाणें मी औरंगाबादेस पोहोंचलों. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं महाराजांच्या दर्शनार्थ त्यांना शोधीत फिरत असतांना चौकांत एका मारवाड्याच्या दुकानीं महाराजांची स्वारी कांहीं खटपट करीत बसलेली होती, तेथें गेलों व नमस्कार केला. मला पाहतांच त्यांनीं मला शिव्या देण्यास आरंभ केला व तोच मला शुभ शकून झाला, व मनाच्या ठिकाणीं आनंद वाटूं लागला. मी तेथें बसलों. महाराजांनीं त्याच ठिकाणचा कागद घेऊन दौत लेखणी आणून त्या कागदावर कांहीं अक्षरें लिहिलीं, व दुसरा एक कागद घेऊन व लिहिलेला कागद स्वतःचे डावे तळहातावर ठेवून दुसरा कागद त्यावर ठेवला; व उजवे हातानें त्यावर दाबलें तों तीं अक्षरें दोन्ही कागदावर उठलेलीं पाहून कागद माझ्या स्वाधीन केले. ही त्यांची कृति आपल्या मनांतील संकल्पासच अनसरून झालेली पाहून माझा महाराजांनीं हेतु पूर्णपणानें ओळखून प्रसाद दिला असें वाटून मला अत्यानंद झाला. इतक्यांत महाराजांनीं 'जा, उद्योग कर' ह्मणून सांगतांच मी चरणावर मस्तक ठेवलें व निघून येऊन विडास छापखाना आणविला, व नोकरी तात्काळ सोडली. महाराजांच्या दयेनें आज तेरा वर्षे झालीं, आनंदानें कुटुंबपोषण

होत आहे व त्यांच्याच प्रसादानें हें घरदार, शेतवाडी, दुकान सर्व कायमचें वरील मुदतींत झालें आहे.

माझा अनुभव व थोडी हकीगत मी खालीं देतों. माझे वडील निजामशाहींत सरकारी नोकर असत. व त्यांनी मला बालपणीं तिकडील राजभाषेचें ह्मणजे फारशी, उर्दू वगैरे शिक्षण दिलें होतें. मी सन १३०२ फसलींत वकीलाचा अभ्यास करून औरंगाबादेस परीक्षेस आलों होतों. त्यास आज बारा वर्षे झालीं. मी तिकडील गष्तीनिषाणतीन या कायद्याचा एक वृक्ष करून प्रसिद्धही केला होता. तो पाहून औरंगाबादचे सेशन कोर्टाचे नाजम साहेब फार खुष झाले व आपले कचेरींत राहाणेविषयीं त्यांनीं मला आज्ञा केली. परंतु त्या वेळेस हैदराबादेस एक प्रदर्शन उघडणार होतें व मी अनेक प्रकारचीं फारशी अक्षरें लिहीत होतों; तसेंच कातरण्याचीं कामें व दुसऱ्या प्रकारचीं कामेंही करीत होतों. तीं सर्व नांदेडच्या अव्वल तालुकदार साहेबांनीं पाहून मलाही प्रदर्शनास जाण्याचा लेखी हुकूम दिला होता. माझाही नाद तेथें जाण्याचा असल्यामुळें मी हैद्राबादेहून आल्यावर आपले येथें राहीन असें नाजम साहेबांस कबूल केलें होतें. मी हैद्राबादेस जाण्याची सर्व तयारी केली व अस्तमानाच्या वेळीं चौकांतून फिरत असतां हे महाराज एका कपडेवाल्याच्या दुकानावर ( ज्यास अबदारखान्याचें दुकान म्हणतात ) बसले होते आणि त्यांनीं पाटीलबुवा पाटीलबुवा ह्मणून हांकः मारली. अर्थात् माझी दृष्टि त्यांच्याकडेस गेली, आणि महाराज मलाच हांका मारीत आहेत कीं काय, असें मला वाटलें ह्मणून मी तेथें गेलों. त्यांना नमस्कार केला. त्यांनीं मला बस ह्मणून सांगितलें, आणि तेथील दऊत लेखणा घेऊन पडलेले कांहीं कागद आणले, आणि तें माझ्यासमोर येऊन बसले व त्यांनीं त्या कागदावर पूर्वी कांहीं देवाचीं नांवें लिहिलीं. नंतर कांहीं अंक लिहिले व पुढें एक कुंडली उत्तम काढून त्यांतही मनास वाटतील त्याप्रमाणें अंक घातले, त्याखालीं कांही मजकूर लिहिला, व कागद माझे स्वाधीन केला,व दऊत लेखणी माझ्यापुढें ठेवून मला कांहीं मजकू

र लिहिण्यास सांगितला. तेथील लोकांनीं महाराजांचा हा प्रसाद आहे म्हणून सांगितलें. मी तो घेऊन नमस्कार करून निघत आहे तोंच ते म्हणाले, 'जा, काम कर.' मी दुसरें दिवशीं हैद्राबादेस गेलों. पुढें तेथून लवकरच नांदेडास येऊन कलेक्टर आफिसामध्यें नौकर झालों. त्याच वर्षांत मी जालन्यास बदली होऊन गेलों. महाराजांचा प्रसाद झाल्यावर मला दोन महिन्यापासूनच ज्योतिषाचें अध्ययन करावें अशी इच्छा झाली, व मी शिकण्यास आरंभ केला. पुढें कांहीं दिवस नोकरी करून मी राजीनामा दिला, व ज्योतिषावरच आतां कारखाना चालू आहे त्यांच्या दयेनें कांहीं कमी नाहीं, व त्यांत ते मला यशही देत आहेत. याशिवाय त्यांचे मला पुष्कळ अनुभव आलेले आहेत.

---

## भाग चौथा.

बाळकृष्ण महाराजांच्या पन्नासाव्या वर्षी यांच्या वडिलांचा अंत झाला. यांचा वडील बंधू सदाशिव आपल्या बापाच्या पूर्वीच निवर्तला. शके १८१९ पौष शुद्ध ९ रोजीं महाराजांस सर्व हिंदु लोकांनीं संन्यासदीक्षा देवविली होती. त्याचें कारण असें समजतें कीं, यवन लोकांनी महाराजांचा आत्मा ब्रह्माडास गेल्यावर यवनी धर्मप्रमाणें त्यांची कबर करावी असा विचार केला होता. म्हणून हिंदुलोकांनीं हा संस्कार त्यांना दिला. नाहीं तर यांना सन्यासदीक्षेची काहीं एक अवश्यकता नव्हती. यांचें मन केव्हांच संन्यासी बनलें होतें. असो. शके १८२० आश्विन कृष्ण तृतीयेस दिवसा ११ वाजतां महाराजांनीं आपला आत्मा परमात्मस्वरूपास मिळवून दिला, आणि शेंवटचें कलेवररूपी कवच या भूमीवर टाकून दिलें. आश्विन कृष्ण द्वितियेचे दिवशीं महाराजांची प्रकृति थोडी बिघडली होती. त्यांना ज्वर आला होता. परंतु त्यांच्या बोलण्याचा ओघ एकसारखा चालला होता. फिरणें मात्र बंद झालें होतें, आणि उदयीक ११ वाजतां आम्ही महायात्रेस जाणार म्हणून आपल्या प्रेमळ भक्तांना त्यांनीं सांगि-

होते. यांची अति अशक्तता झालेली पाहून, लोकांसही आतां हे दोन दिवसांचे सोबती आहेत, असें वाटूं लागलें होतें. यांचा काल होण्या- पूर्वी हे गुळमंडीच्या हौदाजवळील मार्तंड रामजी लाड सोनार यांचे घरीं फार वसत असत. व मार्तंडासही त्यांची अतिशय भक्ति असे. अश्विन कृष्ण द्वितियेचे दिवशीं हे सकाळीं त्याच्या घरीं जे गेले ते सर्व दिवस तेथेंच राहिले.अस्तमानीं महाराजांची प्रकृति बिघडल्यावर मार्तंड फार रडूं लागला, तेव्हां ते त्याला ह्मणाले, उद्यां ११ वाजेपर्यंत मी तुझ्या संगतीला आहें, मग रडतोस कां? महाराजांची प्रकृति विशेष बिघडल्याची ही बातमी गांवांत लवकरच पसरली. तेव्हां रात्रीं लोकांचा बराच समुदाय महाराजांची शुश्रुषा करण्याकरितां जमला होता. पोलि- सचे शिपाईही महाराजांस लोकांकडून विशेष तकलीफ न व्हावी, ह्मणून तेथें येऊन बसले होते. भजनी लोक येऊन त्यांचा तेथें भजन कर- ण्याचा तडाखा चाललाच होता. महाराजांचा 'नारायण' नामाचा घोष एकसारखा चालला आहे, अशी सर्व रात्र गेली. सकाळीं मार्तंड सो- नाराच्या घरासमोर अतिशय दाटी झाली. स्त्रिया पुरुषांची एकच ग- र्दी होऊन गेली होती. ज्यांना त्यांना वाटे कीं, महाराजांचें शेवटचें द- र्शन एकदां तरी व्हावें, आणि महाराजांनीं आपणावर कांहीं प्रसाद- कृति करावी. शेकडों लोक पूजासाहित्य घेऊन महाराजांची शेवटची पूजा करण्यास आले होते. साडे अकरा वाजण्याचा समय आला, तेव्हां ते ह्मणाले 'ज्या देहाकडून आजपर्यंत तुह्मांला त्रास घ- डला, त्याच्यावर तुम्ही आतां दया करा, अगर करूं नका; परंतु मी तर याला आतां औरंगाबादेस टाकणार आणि जाणार!' इतकें सरळ भापण महाराजांचें कोणी कधींही ऐकिलें नव्हतें. पुनः महाराज ह्मणूं लागले: ' मुहूर्त समीप आला. चला, ह्मणा 'नारायण, नारायण, नारायण,' असा तीन, वेळां महाराजांनीं नामोच्चार केला. व तिसऱ्या नारायण' ह्मणण्यावरोबर महाराज शांत झाले. जमलेल्या जन- समुहांत एकच हाहाकार झाला. लोकांच्या नेत्रांतून एक सारख्या अ- श्रुधारा चालल्या होत्या. कित्येकांनीं दीर्घ आक्रोशास आरंभ केला. कां-

हीं मंडळी महाराजांच्या गळ्यास मिठी मारून रडूं लागली. कित्येक तेथेंच लोळत पडले, कित्येक बेशुद्ध झाले सर्वतोमुखीं ' आज औरंगाबादचें खरें वैभव गेलें' अशीं अक्षरें निघूं लागलीं. लगेच सर्व शहरांत ही वार्ता पसरली. कित्येकांनीं बातमी ऐकतांच जेवण सोडलें; कित्येक अर्ध स्वैपाकांतूनच उठले; सर्व लोकांस दिशा शून्य भासूं लागल्या. औरंगाबाद शहरास एकदम उदासीनता आली. सर्व लोकांचे चेहरे उतरून गेले, उल्हासवृत्ति नाहींशी झाली. आबालवृद्धांच्या डोळ्यांतून पाण्याच्या एकसारख्या धारा चालल्या. व्यवहारिक कामें सुचेनाशीं झाली. कित्येक नोकरचाकर भक्तांनीं रजा घेतल्या. दुकानदारांनीं दुकानें बंद केलीं. गांवांत सर्व जातींत दुःखाचा कहर झाला. बनेमियासाहेब बसल्या ठिकाणीं मोठमोठ्यानें ' शहरमे अन्धेरा हुवा, शहरमे अन्धेरा हुवा,' असें एक सारखे तासभर म्हणत होते. तात्काळ भजनी लोकांचे समुदाय बरेच जमले पुष्पविमान केळीच्या खांबांसह तयार झालें. महाराजांस कित्येक भक्तांनीं मौल्यवान् वस्त्रें आणिलीं. पूजा समारंभ भाविक मंडळीचा सुरू झाला. मंगळ आरत्या होऊं लागल्या. चौघडेवाल्यांनीं आपले चौघडे आणून तेथें वाजविण्यास आरंभ केला. दीड वाजेपावेतों पांच सहा हजारावर मंडळी जमली. लष्करी पुरभय्ये, रजपूत वगैरे लोक उघडेबोडके कपाळास गुलाल लाऊन महाराजांच्या मिरवणुकीस येऊन दाखल झाले. बेंडबाजा, तासेवाले, वाजंत्री, कलगीतुरेवाले व गोंधळी हे सर्व जमा झाले. भजनीमेळ्याबरोबर मृदंग, पखवाज, टाळ, असून टाळांचा व इतर वाद्यांचा गजर होत असतां, दीड वाजण्याच्या सुमारास, श्रीबाळकृष्णमहाराजांस विमानांत बसविलें आणि 'जय बाळकृष्ण महाराज!' म्हणून तें उचललें. पाण्याच्या पखालीचा सडा सडकेवरून एकसारखा चालू होता. गुळमंडीपासून सुपारी मारुतीच्या मागून मच्छीखडकावरून चौकांतून महाराज मिरवत चालले. चौकांत तर पंधरावीस हजारावर मनुष्यें जमलीं होतीं. महाराजांवर गुलाल, बुका, पुष्पें किती उधळत होतीं, तें लिहिण्यास लेखणी असमर्थ आहे. पेढे, बर्फी, रेवड्या, पैसे,

चवल्या, पावल्या, वगैरे उधळण्याचा तर पाऊस पडत असे. तो लोकांस वरच्यावरच प्रसाद मिळत असे. महाराज ज्यांच्या ज्यांच्या दुकानासमोर आले, त्यांनी काहीं एक न पाहतां आपले दुकानांतील सामान त्यांच्यावर उधळण्यास आरंभ केला. हलवायांनीं पेढेबर्फीच्या परातीच्या पराती उधळल्या; वाणी लोकांनीं खारीकखोबऱ्यांची पोत्यांचीं पोतीं उधळून पार केलीं; फुलवाल्यांनीं फुलें, अत्तरवाल्यांनीं अत्तरें, बुक्का, अगरजा, वगैरे उधळला; आणि स्वारी मच्छीखडकावर येतांच, विश्वयोपितांनीं दुःखप्रदर्शनार्थ औदास्यवृत्तीनें शोकरसांत मर्शिया गाण्याचे आलाप सुरू झाले. कापूर, गुग्गूळ, ऊद, अगरबत्त्या, तर चोहोंकडे जळत होत्या. त्यावेळीं वाऱ्यानेंही मंदमंद गतीनें त्यांचा परिमळ सर्वांच्या घ्राणेंद्रियांत शिरवून, अंतःकरणास आनंद देण्याचें काम या साधुसेवेकरितां पत्करिलें होतें काय असें वाटलें.

विमानांतील महाराजांची मूर्ति पुष्पांनीं आणि गुलालबुक्क्यांनें अदृश्य झाली होती. म्हणून फोटोग्राफरांनीं सज्ज करून आणलेल्या यंत्रांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. सराफ्यांतून व राजाच्या बाजारांतून मिरवितांना ब्राह्मणांच्या कित्येक सौभाग्यसंपन्न, कुंकुमविराजित स्त्रियांनीं पंचारत्या तयार करून, महाराजे द्वारासमोर येतांच आपआपल्या सज्जावरून त्यांस त्यांनीं ओवाळिलें. सर्व जातीचे लोक महाराजांचे बरोबरच होते. किराण्या चावडीवरून, पाण्याच्या दरिव्यांतून, सुपारी मारुतीसमोरून, औरंगपुऱ्यांतून, नागेश्वराजवळ जाण्यास सरासरी रात्रीचे साडे दहा वाजले. अस्तमान होतांच मशाली लागल्या. आतषबाजी झाली. सर्व जातीच्या लोकांच्या तोंडांतून असे उद्गार निघाले कीं, 'असा समुदाय आणि मिरवणुकीचा थाट आजपावेतों कधींच कोणाच्या दृष्टीस पडला नाहीं.'

राजाराम काहार डिंबर याचें शेत नागेश्वराजवळच आहे. यानें महाराजांच्या समाधीसाठीं आपल्या शेतांत जागा दिली. तेथें छाती इतकें खणले असतांनाच वाळू आणि पाणी निघालें. महाराजांसाठीं गंगाच तेथें आली असावी. कारण, जवळच समाधीचा पाया

दोन दोन पुरुष खोल खणला असतांना पाणी वगैरे कांहींच निघालें नाहीं. व पूर्वी वाळू वांचून कांहींच निघालें नव्हतें. असो. साडे आकरा वाजतां महाराजांची पूजाअर्चा, आरती वगैरे शेवटचे उपचार करून त्यांना समाधि दिली. आणि लोक आपआपल्या घरीं चालते झाले.

शेट सदाशिव बापू अहेर सोनार, राहणार नागत, तालुके कन्नड, हे महाराजांचे पूर्ण भक्त आहेत. यांनीं महाराजांचे पुष्कळ स्वानुभवाचे चमत्कार सांगितले आहेत, परंतु ते स्थलसंकोचास्तव येथें सादर करितां आले नाहींत.

याशिवाय या खुद्द ग्रंथकर्त्याजवळ पत्रद्वारें वगैरे आलेले महाराजांच्या अनुभवाचे लेख, व कित्येकांनीं समक्ष येऊन सांगितलेले अनेक चमत्कार यांचीं टिपणें पुष्कळ आहेत. ही सर्व भक्तिरसप्रपूरित माहिती दुसऱ्या एकाद्या स्वतंत्र पुस्तकाचे रूपानें भक्तिमान् व श्रद्धाळू वाचकवृंदास अर्पण करावी, असा माझा मानस आहे. परंतु हें पुस्तक प्रसिद्ध होणें केवळ लोकाश्रयावर अवलंबून आहे, हें मी सांगितलें पाहिजे असें नाहीं.

**श्रीकृष्णार्पणमस्तु.**

शुभं भवतु.



# विज्ञप्ति.

मी ' ग्रहविहारभुवन ' वै ' फज्योतिषादर्शमंदिर ' नांवाची संस्था पैठणास स्थापन केली आहे. या संस्थेत ज्योतिःशास्त्रांतील फल-ज्योतिष व सिद्धांतसंहितादि ग्रंथांचा पूर्ण संग्रह करावा असा माझा उद्देश आहे. कारण, आज पावेतों अशा प्रकारच्या सर्व ज्योतिष विषयांवरील ग्रंथांचा संग्रह एकेच ठिकाणीं कोठेंही पाहण्यांत आला नाहीं. निदान आमच्या प्रांतांत अशा संग्रहाची वार्ता किंवा कल्पना ही कोणास नाहीं. ज्योतिष शास्त्राचे निरनिराळे ग्रंथ निरनिराळ्या ठिकाणीं पसरलेले क्वचित् दृष्टोत्पत्तीस येतात, परंतु अशा सर्व प्रकार-च्या ग्रंथांचा संग्रह एकाच ठिकाणीं झाल्यास ज्योतिषशास्त्रांत पारं-गत झालेल्या विद्वानांस आणि त्या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या उत्सुक विद्यार्थ्यांस फार फायदा होणार आहे,असें मनांत येऊनच या भुवनाची स्थापना केली आहे.

यामध्यें मी आपल्या खर्चानें ज्योतिष शास्त्रावरील अनेक छापी-ल व हस्तलिखित ग्रंथ जमविले आहेत, व ते जमविण्याचें काम ईशकृपेनें असेंच चालविण्याचा माझा विचार आहे.मात्र विनंती इतकीच आहे कीं, ज्या कोणाजवळ ज्योतिषशास्त्रासंबंधीं कोणत्याही भाषेंतील ग्रंथ असतील त्यांनीं ते या संस्थेस पाहिजे तर विकत द्यावे, अथवा ते संस्थेस अर्पण करावे, अथवा त्यांची प्रत करून घेण्याची आह्मास परवानगी द्यावी, ह्मणजे आह्मी त्यांचे फार आभारी होऊं.

ग्रंथाभावामुळें व ज्योतिषशास्त्राच्या अपुऱ्या ज्ञानानेंच आपणास पूर्णज्ञानी मानणाऱ्या ज्योतिर्विदांच्या सुळसुळाटामुळें ज्योतिःशास्त्रा-वरील लोकांचा विश्वास डळमळत आहे अशा वेळीं ज्योतिःशास्त्रा-संबंधानें पटवतां येतील तितके दाखले पटवून लोकांचा विश्वास जागृत करणें हें ज्योतिषशास्त्राभिमानी प्रत्येक पुरुषाचें कर्तव्य आहे. आमची संस्था अशा प्रकारचें कर्तव्य आपल्या शक्त्यानुसार बजावीत आहे हें मी पुणें, मुंबई, नाशिक, पंढरपूर, औरंगाबाद, बीड, अंबाजोगाई,

कचड वगैरे ठिकाणीं हिंडत असतां मी केलेल्या लोकसेवेबद्दल वर्तमानपत्रांतून जी चर्चा झाली आहे त्यावरून सहज कळून येणार आहे.

या संस्थेकडून अभ्यागत विद्वान् पाहुण्यांचीं व्याख्यानें, पुराणें, कीर्तनें वगैरे होत असून शक्त्यनुसार त्यांची संभावनाही करण्यांत येते. शिवाय ज्योतिष व फलज्योतिष यावर दरमहा येथें व्याख्यानें देण्यांत येतात. तसेंच येथें ज्योतिषशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस पाठही देण्याचा विचार आहे. अशा रीतीनें ज्योतिष व फलज्योतिष या शास्त्रांचा प्रसार करण्याकरितां ही संस्था सतत झटत असते.

अशा संस्थांस लोकाश्रयाची फार जरूर असते यासाठीं या संस्थेस द्रव्यद्वारां, पुस्तकद्वारां, किंवा अन्य उपायांनीं धनिक व रसिक लोकांनीं आश्रय देऊन तिचें संवर्धन केलें पाहिजे यास्तव तशी त्यांस बुद्धि व्हावी आणि आरंभिलेलें हें कार्य यशस्वी व्हावें अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून हा विज्ञप्तिलेख मी पुरा करितों.

**भगवंत गोविंद लोंढेवाले.**

चालक, ग्रहविहारभुवन व फलज्योतिषादर्शमंदिर, पैठण.

ता. क—येथेंच मी अशी एक विनंती करून ठेवतों कीं, एकाच कुटुंबातील माणसांच्या कुंडल्या कोणी पाठविल्यास त्यांचा संग्रह करून प्रत्यक्ष अनुभवावरून ताळे मिळवून एखादी सुबोध ग्रंथरचना करण्याचा माझा विचार आहे. तरी अशा कुंडल्या मजकडे कोणी पाठविल्यास मी त्यांचा फार आभारी होईन.

## रमलशास्त्र !

सदर शास्त्राचे चमत्कार लोकांस अत्यंत गुंग करून टाकणारे असल्याविषयीं प्रसिद्धि आहे. परंतु या शास्त्रावरील सर्वच ग्रंथ आरबी व फारशी वगैरे भाषांमध्यें असल्यामुळें त्याचें ज्ञान आपल्या लोकांस दुष्कर झालें आहे. यासाठीं सदर ग्रंथांची सुबोध मराठी भाषांतरें करून ती लोकांस सादर करण्याचा माझा विचार आहे.

लोकाश्रय मिळेल त्या मानानें ग्रंथ तयार करण्यास स्फूर्ति येणार आहे ग्रंथ लवकरच छापून प्रसिद्ध करणार आहों. तरी रसिक लोकांनीं मान्य करावा अशी विनंती आहे.

ग्रंथकर्त्ता.

---

## प्रोफेसर पिंपळखरे यांचें औदार्य.

प्रसिद्ध चित्रकार प्रोफेसर सदाशिव कृष्ण पिंपळखरे यांणीं श्रीसद्गुरु बाळकृष्णमहाराज यांची ऑईल पेंटिंगची एक सुंदर तसबीर तयार करून ती भक्तिपुरःसर 'महाविहारभुवन' संस्थेस अर्पण केली आहे, ही फार संतोषाची गोष्ट होय. सदर तसबीर ४२ इंच लांब आणि ३२ इंच रुंद अशी आहे. तसबिरीचें काम उत्कृष्ट झालें असून श्रीसत्पुरुषदर्शन प्रत्यक्ष झाल्याप्रमाणें वाटतें, इतकी हुबेहुब ती निघाली आहे. एकंदरीनें ही तसबीर प्रो. पिंपळखरे यांच्या कीर्तीला विशेषच शोभा देत आहे. प्रो. पिंपळखरे यांच्या चित्रकलाकौशल्याची कीर्ति आज सर्व हिंदुस्थानांत मशहूर आहेच. इतकेंच नव्हे, तर अत्यंत सुधारलेल्या विलायतेसारख्या ठिकाणींसुद्धां यांचे गुणांची वाहवा झाली आहे. चित्रकलेंत अत्यंत प्रसिद्धीस आलेले चित्रकार राजा रविवर्मा यांच्या हस्तकौशल्याची कीर्ति सर्वत्र झाली असून राजारविवर्मा यांच्या अमोल्य गुणाचें अनुकरण करून पुढें येत असलेले हिंदुस्थानांतील दुसरे चित्रकार प्रो. पिंपळखरे हेच होत. हे अद्यापि तरुण असून चित्रकलेचा व्यासंग त्यांचा सतत चालू आहेच. इतके गुणी असून यांचे अंगीं विनय, सुशीलता हे गुण आहेतच. विद्या असून त्यांत या आणखी दोन सद्गुणांची भर पडल्यामुळेच प्रो. पिंपळखरे यांच्या हातून श्रीबाळकृष्णमहाराज यांची तसबीर स्वतःच्या खर्चानेंच तयार झाली, याबद्दल प्रो. पिंपळखरे यांचे अभिनंदन करणें अवश्य आहे. प्रो. पिंपळखरे यांची कीर्ति दिवसेंदिवस ज्यास्त होऊन ते दीर्घायु होवोत, अशी आमची ईश्वरास प्रार्थना आहे.

चालक, महाविहारभुवन वगैरे.

---

# आश्रय दात्यांचीं नांवें.

१ श्रीयुत डा. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, मुंबई.
२ श्रीमती राणी लक्ष्मीबाईसाहेब, इनामी जाहागिरदार, श्री एकनाथ महाराज, पैठण.
३ श्रीयुत महाराज रा. रा. रघुनाथ श्रीरंग बुवासाहेब संस्थान श्रीशिवदिन केसरी, पैठण.
४ श्रीयुत रा. रा. एकनाथ अनंत उर्फ आण्णासाहेब बारसकर, कारभारी, संस्थान श्री एकनाथ.
५ श्रीयुत रा. रा. अंबादास रावजी तात्यासाहेब भाकरे, साहुकर, पैठण.
६ श्रीयुत रा. रा. कृष्णराव गुरुराव थाडकीकर, वकील, जालना.
७ श्रीयुत रा. रा. पंडितराव वैद्य महाजन, पैठण.
८ श्रीयुत रा. रा. बापूसाहेब महाजन, कोतवाली पाटील, पैठण,
९ श्रीयुत रा. रा. नारायण गोविंद तोडेवाले, सिगेदार, जबाबनवीस, पैठण.
१० श्रीयुत रा. रा. गोविंदराव राक्षसभुवनकर, सिगेदार, पैठण.
११ श्रीयुत रा. रा. बळवंत रामचंद्र बेलीफ, शेवगांव.
१२ श्रीयुत रा. रा. रामरावजी देशपांडे, आंबेकर, शिरस्तेदार, सदर मुन्सफी, औरंगाबाद.
१३ श्रीयुत रा. रा. पंडितरावजी वकील, दर्जे दुयम, औरंगाबाद.
१४ श्रीयुत रा. रा. गंगाधर गोपाळ, सिगेदार, फौजदारी तहसील, औरंगाबाद.
१५ श्रीयुत रा. रा. प्रेमराज डालवाले, पैठण
१६ श्रीयुत रा. रा. देवताजीपंत कुळकर्णी, बीड.
१७ श्रीयुत रा. ब. बाबूराव भालचंद्र ओंकार, पुणें.
१८ श्रीयुत रा. सा. विष्णु सदाशिव केळकर, मामलेदार, तालुके हवेली, पुणें.
१९ श्रीयुत रा. रा. बाळकृष्ण महादेव केळकर, वकील, पुणें.
२० श्रीयुत शेट किसनदास विष्णुदास कापडवाले, कापडदुकान, बुधवार चौक, पुणें.
२१ श्रीयुत वैद्यराज आयुर्वेद महोपाध्याय शंकरशास्त्री पदे, मुंबई.
२२ श्रीयुत रा. रा. वैद्य गोपिनाथ कृष्णाजी क्षत्रिय, मुंबई.

REFBK-0000188